MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष पंचविसावे / अंक ११ / नोव्हेंबर २०२४

## संपादकीय

### उत्तीर्ण गुणांची टक्केवारी

महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण विभागाने नुकताच एक निर्णय जाहीर केला आहे. या निर्णयानुसार १० वीच्या परीक्षेत गणित आणि विज्ञान या विषयांत २० टक्के गुण मिळविले तरी विद्यार्थी उत्तीर्ण होणार आहे. या आधी परीक्षा पास होण्यासाठी ३५ टक्के गुणांची मर्यादा होती. ती आता २० टक्क्यांवर आणली आहे. जे विद्यार्थी गणित आणि विज्ञान या विषयात कच्चे असतात त्यांचे नुकसान होऊ नये या हेतूने हा निर्णय घेण्यात आला आहे. हे जरी खरे असले तरी या निर्णयाचे दूरगामी परिणाम काय होतील याचा विचार करणे आवश्यक आहे. अशा विद्यार्थ्यांना गणित आणि विज्ञान यावर आधारित उच्च शिक्षण घेता येणार नाही अशी अट घालून खरेच काही साध्य होणार आहे का?

१९५०-६० च्या दशकात विज्ञान आणि गणित हे विशेष शालांत परीक्षेसाठी अनिवार्य नव्हते. आठवीपर्यंत सामान्य विज्ञान आणि गणित शिकायचे आणि नववीपासून कला किंवा वाणिज्य शाखा निवडून या दोन विषयांना रामराम ठोकता येत असे. भारत सरकारने १९६४ मध्ये राष्ट्रीय शिक्षण आयोगाची स्थापना केली. प्राध्यापक डी. एस. कोठारी या आयोगाचे अध्यक्ष होते. म्हणून या आयोगाला 'कोठारी आयोग' असे संबोधले जाते. या आयोगाने शालेय शिक्षणाचा सांगोपांग विचार करून काही बदल सुचविले. त्यातील महत्त्वाचा बदल म्हणजे विज्ञान आणि गणित या दोन विषयांची शालेय शिक्षणातील आवश्यकता. या दोन विषयांचे दैनंदिन जीवनातील महत्त्व जाणून कोठारी आयोगाने हे विषय १० वी पर्यंत सर्वांना शिकविले जावेत असे आग्रही प्रतिपादन केले. १९६८ मध्ये केंद्र सरकारने कोठारी आयोग स्वीकारला आणि त्यांत दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी सुरू केली. एनसीईआरटी त्यानुसार अभ्यासक्रम आराखडा तयार केला. वेगवेगळ्या राज्यांनी देखील आपले अभ्यासक्रम तयार केले. १९७५ साली महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाने गणित आणि विज्ञानासह पहिली परीक्षा घेतली. त्यावेळी अनेक शाळांचे निकाल खाली आले होते. ते सुधारण्यासाठी वेगवेगळ्या स्तरांवर प्रयत्न करण्यात आले. या प्रयत्नांना चांगली फळे देखील आली. असे असताना उत्तीर्ण गुणांची टक्केवारी कमी करण्याचा निर्णय का घेण्यात आला याचे आश्चर्य वाटते.

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

पाच दशकांपूर्वी टाटा मूलभूत संशोधन संस्थेत विज्ञान आणि गणित शिक्षणात मूलभूत संशोधन करण्याच्या उद्देशाने होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली. सुरुवातीपासूनच या केंद्राने वंचित समाजातील विद्यार्थ्यांचे शिक्षण यावर आपले लक्ष केंद्रित केले. १९८० मध्ये केंद्राने एक संशोधन प्रकल्प हाती घेतला होता. दुर्बल गटातील विद्यार्थी विज्ञान आणि गणित या विषयांत मागे का पडतात हे समजून घेऊन, त्यांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी अध्यापन पद्धत विकसित करणे हा त्या प्रकल्पाचा उद्देश होता. १९८० ते १९८६ अशी सात वर्षे चाललेल्या या प्रकल्पांतून विद्यार्थ्यांच्या अध्ययन अडचणींची माहिती झाली. त्याचबरोबर त्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी आवश्यक अशी उपचारात्मक पद्धती विकसित करण्यात आली. या पद्धतीची माहिती देणारी अनेक पुस्तके प्रकाशित करण्यात आली आहेत. एवढेच नव्हे तर, या पद्धतींची ग्रामीण, तसेच आश्रम शाळांमध्ये चाचणी देखील घेण्यात आली. त्यासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणींची माहिती देऊन त्यावर काय उपाययोजना करावी याची माहिती शिक्षकांना प्रशिक्षण सत्रातून देण्यात आली. त्यांना योग्य ते शैक्षणिक साहित्य पुरविण्यात आले. पद्धतशीरपणे केलेल्या मूल्यमापनात असे लक्षात आले की, उपचारात्मक पद्धतीचा वापर करून शिकविल्यास आश्रम शाळांमध्ये शिकणाऱ्या आदिवासी मुलांचा शैक्षणिक स्तर नोंद घेण्याजोगा सुधारतो.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा मागील काही दशकांत खूप विकास झाला आहे. त्यांचे पडसाद समाजावर पडलेले आपल्याला दिसतात. दैनंदिन जीवनातील अनेक बाबींवर या प्रगतीचा प्रभाव आपल्याला पाहायला मिळतो. आता तर कृत्रिम बुद्धिमत्ता समाजजीवनावर प्रभाव पाडत आहे. त्यामुळे विज्ञान आणि गणिताचा अभ्यास न करता यशस्वी जीवन जगता येईल असे वाटत नाही. त्यासाठी हे दोन्ही विषय शालेय स्तरावर अतिशय काळजीपूर्वक शिकविले जाणे आवश्यक आहे. या विषयांत विद्यार्थ्यांना आवड कशी निर्माण होईल यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे. विज्ञानाचे अध्यापन प्रयोगाच्या मदतीने करता यावे यासाठी शालेय स्तरावर सुसज्ज प्रयोगशाळा निर्माण केल्या पाहिजेत. गणितात अनेक अमूर्त संकल्पना आहेत. त्यांचे आकलन होण्यासाठी 'गणित प्रयोगशाळा' विकसित करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर गणितात आवड निर्माण करण्यासाठी विविध मार्ग स्वीकारण्याची गरज आहे. भास्कराचार्यांनी ९०० वर्षांपूर्वी लिहिलेल्या 'लिलावती आणि बीजगणित' या पुस्तकात अनेक मनोरंजक उदाहरणे आहेत. त्यांचा उपयोग अध्यापनात करता येईल. मूळ समस्येचे निराकरण करण्यासाठी अभ्यासक्रम बदलणे, नवीन अध्यापन पद्धती स्वीकारणे, शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण करणे, उपयुक्त शैक्षणिक साधनांची निर्मिती करणे अशा बाबींकडे काळजीपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे. उत्तीर्ण गुणांची मर्यादा खाली आणून काहीही साधणार नाही.

शालेय शिक्षणात शिकवले जाणारे विषय सर्व विद्यार्थ्यांना चांगले समजणे आवश्यक आहे. त्यातील १/३ जरी समजले तरी उत्तीर्ण असा नियम आधी ठरविण्यात आला होता. तो बदलण्याची गरज आहे असे वाटत नाही. याउलट विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर कसा उंचावता येईल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. सध्याचे युग स्पर्धेचे आहे. त्यासाठी आपल्या पुढच्या पिढीला तावूनसुलाखून तयार करणे आवश्यक आहे. असे जर झाले नाही तर आजच्या स्पर्धेच्या युगात ते टिकून राहतील असे वाटत नाही. याचा परिणाम देशाच्या विकासावर झाल्याशिवाय राहणार नाही.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष पंचविसावे/अंक ११/नोव्हेंबर २०२४

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २९ वे/अंक ५ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*


| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) सर रतन टाटा : भारतीय उद्योग क्षेत्रातील दूरदर्शी नेता | डॉ. रुपाली जामोदे | ३ |
| ३) 'कथा जैवविविधतेची' - पुस्तक परिचय | डॉ. मानसी देशमुख | ५ |
| ४) कर्वे दांपत्यांची दोन पुस्तके : आत्मकथने | शेफाली वैद्य | ८ |
| ५) समुद्र मंथन एक यशोगाथा | आसावरी कुळकर्णी | ११ |
| ६) 'A La Carte अलास्का' | डॉ. जयश्री पवार | १४ |
| ७) उंटांची अद्भूत रम्य दुनिया २०२४ हे आंतराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष | सौ. अल्पना बापट | १७ |
| ८) मनसर | दिलीप वंडलकर | २१ |
| ९) बांगलादेश : ग्रहण, देवशयन आणि सज्जन | प्रमोद बापट | २४ |
| १०) डीप स्टेटचं नवं प्यादं - सोनम वांगचुक... | अभिजित जोग | २७ |
| ११) परिसर वार्ता | संकलित | ३१ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
  Email : vpmt1935@gmail.com
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# सर रतन टाटा : भारतीय उद्योग क्षेत्रातील दूरदर्शी नेता

*पद्मविभूषण रतन टाटा हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे उद्योगपती. परंतु त्यांना सामाजिक जाण उत्तम. त्यांच्या ठायी असणारी विचारशील प्रगल्भता आपल्याला मार्गदर्शन ठरते. त्यांच्याकडून आपण एक-शतांश जरी शिकलो तरी प्रत्येकाचे भले होईल. अशा दूरदर्शी व्यक्तिमत्त्वाविषयी- संपादक*

सर रतन टाटा हे भारतातील सर्वाधिक आदरणीय उद्योगपतींपैकी एक आहेत, ज्यांनी आपल्या प्रामाणिकपणा, नेतृत्व-कौशल्य, आणि सामाजिक संवेदनशीलतेने भारतीय उद्योग जगाला एक नवीन दिशा दिली आहे. त्यांच्या अद्वितीय दृष्टिकोनामुळे आणि अपरंपार मेहनतीमुळे टाटा समूह केवळ आर्थिकदृष्ट्या नव्हे, तर मूल्याधिष्ठित कामांमुळेही जागतिक स्तरावर प्रसिद्ध झाला आहे. त्यांच्या जीवनातील प्रमुख घटना आणि योगदान यांचा ऊहापोह करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, ज्यामुळे त्यांच्या यशाचा मागोवा घेता येतो.




### प्रारंभिक जीवन आणि शिक्षण

रतन टाटा यांचा जन्म २८ डिसेंबर १९३७ रोजी मुंबई येथे झाला. ते नवल टाटा आणि सोनू टाटा यांचे पुत्र आहेत. रतन यांच्या लहानपणीच त्यांच्या पालकांचा घटस्फोट झाला आणि ते त्यांच्या आजी सर रतनजी टाटांच्या देखरेखीखाली वाढले. टाटा कुटुंब हे उदारमतवादी विचारांचे होते, ज्याचा रतन यांच्या व्यक्तिमत्त्वावर खोल प्रभाव पडला.

त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण मुंबईतील कॅम्पियन स्कूल आणि शिमलातील जॉन कॅनन स्कूल येथे घेतले. त्यांच्या शिक्षणाच्या सुरुवातीपासूनच रतन यांना तंत्रज्ञान आणि नवोन्मेषाचा विशेष रस होता. पुढे त्यांनी अमेरिकेतील कॉर्नेल विद्यापीठातून आर्किटेक्चर आणि स्ट्रक्चरल इंजिनीअरिंगमध्ये पदवी मिळवली आणि त्यानंतर हार्वर्ड बिझनेस स्कूलमधून ॲडव्हान्स मॅनेजमेंट प्रोग्रॅमपूर्ण केले. हे शिक्षण त्यांच्या भविष्यकालीन व्यावसायिक कारकिर्दीची पायाभरणी ठरले.

### टाटा समूहात योगदान आणि नेतृत्व

रतन टाटा यांनी १९६२ साली टाटा समूहात एक प्रशिक्षणार्थी म्हणून काम सुरू केले, जिथे त्यांनी टाटा स्टीलच्या जमशेदपूर प्लांटमध्ये कामगारांबरोबर काम करत विविध अनुभव घेतले. त्यांच्या सुरुवातीच्या कारकिर्दीतच त्यांनी व्यवस्थापनात नव्या तंत्रांचा वापर करून परिणामकारकता वाढवण्याचा प्रयत्न केला.

१९९१ मध्ये जे.आर.डी. टाटा यांच्या निवृत्तीनंतर, रतन टाटा टाटा समूहाचे अध्यक्ष बनले. त्यांच्या नेतृत्वाखाली, टाटा समूहाने अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले. त्यांनी समूहाच्या विविध शाखांची पुनर्रचना करून ती आधुनिक आणि एकत्रित केली.

**प्रमुख अधिग्रहणे :**

टाटा टीने टेटलीचा अधिग्रहण (२०००): या सौद्यामुळे टाटा समूहाने जागतिक चहा बाजारात आपली प्रमुख उपस्थिती निर्माण केली.

टाटा मोटर्सने जग्वार लँड रोव्हरची खरेदी (२००८) या धोरणात्मक निर्णयामुळे टाटा मोटर्सने उच्च गुणवत्तेच्या वाहननिर्मिती क्षेत्रात प्रवेश केला.

टाटा स्टीलने कोरस ग्रुपचे अधिग्रहण (२००७): हे अधिग्रहण तेव्हाच्या काळातील एक मोठे आणि महत्त्वाचे आंतरराष्ट्रीय विस्तार होते.

**टाटा नॅनो – स्वप्नातील कार :**

रतन टाटा यांनी भारतीय मध्यमवर्गाला स्वस्त आणि माफक दरातील कार देण्याचे स्वप्न पाहिले आणि टाटा नॅनो ही कार बाजारात आणली. ही कार जगातील सर्वांत स्वस्त कार होती आणि तिचे उद्दिष्ट होते की, दुचाकीवर प्रवास करणाऱ्या भारतीय कुटुंबांना सुरक्षितता आणि आराम प्रदान करणे. या उपक्रमाने जागतिक ऑटोमोबाईल क्षेत्राचे लक्ष वेधून घेतले आणि नवनवीन तंत्रज्ञानाच्या वापराचे उत्तम उदाहरण ठरले.

**सामाजिक योगदान आणि परोपकार**

रतन टाटा यांची समाजसेवा आणि दानशूर वृत्ती त्यांच्या नेतृत्वाची खरी ओळख आहे. टाटा समूहाने आपल्या नफ्याचा एक मोठा हिस्सा समाजकल्याण, शिक्षण, आरोग्य सेवा, आणि ग्रामीण विकासासाठी दिला आहे. विशेषत: टाटा ट्रस्टच्या माध्यमातून त्यांनी भारतीय समाजातील अनेक समस्या सोडवण्यासाठी आणि गरजूंच्या मदतीसाठी विविध प्रकल्प चालवले आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली, समूहाने स्वच्छ पाणी, मूलभूत आरोग्य सेवा, आणि उच्च दर्जाचे शिक्षण यांसारख्या क्षेत्रांत गुंतवणूक केली आहे.

**व्यक्तिमत्त्व आणि नेतृत्वशैली**

रतन टाटा यांच्या नेतृत्वशैलीत साधेपणा, नम्रता, आणि दृढनिश्चय यांचा संगम होते. त्यांचा विश्वास होता की, व्यवसाय हे फक्त नफा मिळवण्यासाठी नसून समाजाच्या उन्नतीसाठी असावेत. त्यांच्या निर्णयांमध्ये सत्यनिष्ठा आणि दीर्घकालीन दृष्टीकोनाचा प्रभाव स्पष्ट दिसतो. कर्मचाऱ्यांच्या कल्याणावर आणि नवोन्मेषाच्या प्रोत्साहनावर त्यांचा विशेष भर होता.

**पुरस्कार आणि सन्मान**

सर रतन टाटा यांना त्यांच्या अमूल्य योगदानासाठी अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. भारत सरकारने त्यांना 'पद्म भूषण' (२०००) आणि 'पद्म विभूषण' (२००८) हे राष्ट्रीय सन्मान दिले आहेत. याशिवाय, जागतिक स्तरावरही त्यांना अनेक संस्थांनी गौरविले आहे.

**निष्कर्ष**


सर रतन टाटा हे फक्त एक उद्योजक नव्हे तर सामाजिक जबाबदारीचे उदाहरण असलेले नेते होते. त्यांचे काम हे केवळ टाटा समूहाच्या विस्तारावर मर्यादित राहिले नाही, तर त्यांनी भारतीय उद्योगातील मूल्याधिष्ठितता आणि सामाजिक सेवा यांचा आदर्श उभा केला. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन नव्या पिढीने त्याच मार्गाने चालत उद्योग आणि समाज दोन्हींचे उन्नयन साधावे.

**– डॉ. रुपाली श्याम जामोदे**
सहाय्यक प्राध्यापक
व्ही.पी.एम.टी.एम.सी. लॉ कॉलेज
ठाणे

•••

# 'कथा जैवविविधतेची' - पुस्तक परिचय

*'कथा जैवविविधतेची' हे पुस्तक नुकतंच ठाण्यात प्रकाशित झालं. प्रा. डॉ. संजय जोशी यांनी अतिशय चित्रदर्शी व ओघवत्या लिखाणाने फारच रंजक व त्याबरोबरीने जीवशास्त्रीय ज्ञानाची कवाडं सढळ हस्ते उघडून वाचकांच्या हाती सुपूर्द केली आहे. या पुस्तकाचा परिचय डॉ मानसी देशमुख यांनी करून दिला आहे. - संपादक*




'कथा जैवविविधतेची' हे पुस्तक वाचत असताना आपण एक शैक्षणिक सफर करतोय आणि तीही एक सूक्ष्मदर्शक बरोबर घेऊनच असं वाटलं मला.

शैक्षणिक सफरी या आपल्या विचारांना खतपाणी घालतात, नेहेमीच आपल्या जाणिवांना समृद्ध करतात, काय करावं, काय करू नये, का करू नये, एखाद्या कृतीचे फायदे व तोटे व त्याचे परिणाम काय असतील याबाबत वाचकाला विचारमंथन, मनन, चिंतन करायला लावतात, आपल्याच कृती निरखून बघा व चुकीचं पाऊल पडत असेल तर सावध व्हा, योग्य पावलं उचला असा प्रेमळ सल्ला देतात. या सगळ्याची प्रचिती मला या पुस्तकातील प्रत्येक प्रकरण वाचत असताना येत होती.

अफाट अशा विश्वाच्या निर्मितीपासून यातील पहिली कथा सुरू होते, मग त्यावर आधारित वेगवेगळ्या शास्त्रज्ञांनी केलेले अभ्यास व मांडलेले सिद्धांत, सर्वश्रुत व बहुचर्चित बिग बँग थिअरी व पृथ्वीवरील जीवसृष्टी कशी व केव्हा निर्माण झाली असेल यावरील भाष्य हे खिळवून ठेवतं व यात आपण आत्ताचे २०२४ मधले होमो सेपियन्स! आदिमानवापासून ते मानव या अवस्थेपर्यंत पोहोचण्यासाठी जवळपास ५० ते ६० हजार वर्षांच्या इतिहासातून उत्क्रांतीच्या उत्तरोत्तर पायऱ्या चढत मिळवलेलं शहाणपण...

बहुपेशीय मानवाचं या भूमीवरील आगमन व विविध पैलू असलेल्या मानवी बुद्धीला आव्हान देत, परिस्थितीशी जुळवून घेत, चिकित्सेची भूक शमवत या पुस्तकात जैवविविधतेवर, अनुवंशशास्त्रावर बहुमोल प्रयोग केलेले अनेक जीवशास्त्रज्ञ आपल्याला त्यांच्या संशोधनातून भेटतात. त्यांची संशोधनं व निष्कर्ष जर जीवशास्त्र किंवा अनुवंशशास्त्र या विज्ञानशाखांना मिळाले नसते तर आज वैद्यकीय विज्ञान एवढं पुढे गेलंच नसतं याची जाणीव होते!

दुसऱ्या प्रकरणात जैवविविधतेचा मागोवा घेताना एका काल्पनिक कालयानात बसून फिरलेले ४०० कोटी वर्ष मागे जाऊन फिरलेले कालखंड व मिळणारी माहिती विलक्षण आहे.. यातील आर्किओझोईक कालखंडात दिसणारी पहिली आदिपेशी जी आपला सामाजिक

पूर्वज आहे ती ल्युका. एक क्षण ते प्रवासातलं सूक्ष्मदर्शी भिंग आपण हाती घेतो व खरंच कल्पना करतो ती या अतिसूक्ष्म गोळा असलेल्या आदिपेशीच्या रचनेची.. ही ताकद आहे या लेखनाची..

या जैवविविधतेच्या कालखंडाचा अभ्यास करत आपण पोहोचतो तिसऱ्या प्रकरणस्थळी. ते म्हणजे अजून खोलात शिरून पेशी व जैवविविधता या मुक्कामी.. क्रियाशील ल्युका , डी. एन. ए., आर. एन. ए यांनी रचलेल्या या वसुंधरेच्या जीवसृष्टीच्या चक्राचे समग्र दर्शन घडते इथे.. सजीवापासून सजीव निर्मिती, दरवेळी नव्याने अस्तित्त्वात येताना आपली मूलभूत लक्षणं कायम ठेऊन स्वतःची खास लक्षणं विकसन करत पुन्हा पुढील पिढीला जन्म व ही परंपरा सातत्याने चालू राहिल्याने आज पृथ्वीवर आढळणारी ही जीवसृष्टी जिवाणू, अमीबा, बुरशी, हरित वनस्पती व मानवी पेशी फारचं रोचक माहिती!

चौथं प्रकरण मला फारच आवडलं.. एकतर गदिमांच्या शब्दांनी झालेली याची यथोचित सुरुवात.. 'जैवविविधतेचा विणकर' शरीररूपी वस्त्राला कोण विणत असेल? कोण असेल हा विणकर? आधुनिक अनुवंशशास्त्राचे जनक ग्रेगर मेंडेल या ठिकाणी भेटतात.. जीवसृष्टीतील जैवविविधतेला अंतिमत: सजीवांच्या शरीरात असलेल्या पेशींमधील घटक कारणीभूत आहे हे सप्रयोग सिद्ध करणारा महामानव.. या शोधाने एक जेनेटिक्सचा अभ्यास करणारी महाशाखा निर्माण झाली! फार खास व सोप्या लेखनशैलीमुळे हे चटकन लक्षात रहाते.. वाचताना मजा येते ..

मग पुढे पाचव्या प्रकरणात तर अनुवंशशास्त्र.. जनुकं जीन्स हे कसे जैवविविधतेचे जनक आहेत यावर शास्त्रीय विवेचन आहे.. वॅटसन क्रीक यांनी केलेल्या संशोधनाने प्रकाशात आलेले विणकराचे म्हणजे डी. एन. ए च्या रेणूचे अंतरंग हे समजावून सांगण्याकरता लेखकाने वापरलेलं स्वेटरच्या झिपचं किंवा गोल स्पायरल जिन्याचं प्रतीक.. (डेनीन, थायमीन, सायटोसीन व ग्वानीन ही न्युक्लीओटाइड्सच्या रेणूंची कठीण नावं पण सहज लक्षात ठेवता येतील इतकं सोपं उदाहरण..)

सहाव्या प्रकरणात तर मिस्टर लिनियस व त्यांचे सुपरिचित द्विनाम पद्धत तसंच व्हिटेकरांचं पंचसृष्टी वर्गीकरण याचा उल्लेख आहे.. १९८५ मध्ये वॉल्टर रोझेन यांनी प्रचारात आणलेला व आज आपण वापरत असलेला बायोडायव्हर्सिटी या शब्दाचे नामकरण व जनुकीय विविधता, परिसंस्था विविधता व प्रजातीय विविधता या जैवविविधतेच्या तीन पातळ्यांना समजून घेता येतं.

सातवे प्रकरण हे जैवविविधतेच्या अफाट पसाऱ्याची झलक दाखवतं..

इथपर्यंतचा लेखकाबरोबर केलेला या पृथ्वीवरील प्रवास फोटोजेनिक व सिनीक वाटतो.

शेवटाकडे..

पण प्रकरण आठ व नऊ मात्र आपल्याला या शहाण्या का अतिशहाण्या माणसाने ओरबाडून काढलेल्या जैवविविधतेचे पापुद्रे व जखमा दाखवते.. फक्त स्वतःच्या स्वार्थाकरता पर्यावरणाचं आणि जैवविविधतेचं मानवाने म्हणजे आपणच केलेलं नुकसान व या निसर्ग नामक बँकेतील ठेवींची लयलूट बघवत नाही.. पण हे विदारक सत्यदेखील या लेखणीने लिहिलं आहे. कारण कुठेतरी याचा ऱ्हास थांबवा. वसुधैव कुटुंम्बकम याची जाणीव ही डोळ्यांत झणझणीत अंजन घालते.

पण या पुस्तकातील शेवटचे प्रकरण कळसाध्याय वाचून मात्र पुन्हा विवेकी माणसाचं चित्र व पर्यावरण व ही जैवविविधता संवर्धन करण्यासाठी आलेल्या काही रॅलीं व काही संस्था यांच्या प्रशंसनीय कामांचा उल्लेख वाचल्याने मन आशादायी होते.

---

ज्यांना हरण्याची भीती आहे, त्यांचा पराभव निश्चित आहे!

मी वर म्हटल्याप्रमाणे आपण काय केले पाहिजे याचा कृती आराखडा मी मनात तयार केला. फार काही नाही, पण साध्या गोष्टी जसं की..,

झाडं तोडण्यापेक्षा लावणे, प्लॅस्टीकचा वापर न करणे अशा सवयींना जर आपण शिस्तीत आपल्या आयुष्यात अर्थ दिला तर काही अंशी आपण निसर्गाला जखमा करणार नाही व त्याविषयी कृतज्ञ राहू असं मला वाटलं.

शेवटची तीन प्रकरणं ही लेखकाने 'काय करता येऊ शकेल?' याकरता दिलेली संधी आहे असं मला वाटतं.

एकूणच पुस्तक मस्त झालंय, चित्रदर्शीपणा, सहज सोपी भाषा, कविता यांनी या जैवविविधतेला सजीव केलं आहे.. यात भावना आल्या आहेत. एक सुसंस्कृत नागरिक म्हणून कर्तव्यभाव जागृत करण्याची ताकद आहे या पुस्तकात.

एक मानसशास्त्रज्ञ म्हणून मला या लिखाणाचा पर्यावरणीय मानसशास्त्राच्या दुर्बिणीमधून विचार करायला आवडेल.

पुस्तकाचे प्रकाशक सृजनसंवाद प्रकाशनाचे गीतेश शिंदे यांचे आभार, की त्यांनी इतकं सुंदर, रंगीत पुस्तक वाचकांच्या हाती ठेवलं आहे!

नक्की वाचा, आजचं प्रत मागवा.
पुस्तक - कथा जैवविविधतेची
(प्रवास...जीवसृष्टीचा)
लेखक - डॉ. संजय जोशी
पृष्ठे - २३०
मूल्य - ५००

डॉ. मानसी देशमुख या पुणे येथे वास्तव्यास असून, मानसशास्त्रात त्यांनी डॉक्टरेट मिळवली आहे. विद्या प्रसारक मंडळाचे 'दिशा' हे मासिक सुरू करण्यामध्ये डॉ. मानसी देशमुख यांचे वडील, बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे माजी ग्रंथपाल कै. मोहन पाठक यांचा अत्यंत महत्त्वाचा सहभाग होता. त्यांनी सुरू केलेल्या 'दिशा' मासिकात त्यांच्याच मुलीने संजय जोशींच्या पुस्तकावर दिलेला अभिप्राय देतो आहे हा एक विलक्षण योगायोग आहे.

**पुस्तकाच्या लेखकाबद्दल :**

डॉ. संजय जोशी हे आपल्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि शिक्षक. १९७८ साली या महाविद्यालयातून प्राणीशास्त्र विषयाची पदवी घेतल्यानंतर त्यांनी पुणे विद्यापीठातून या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतलं. १९८२ साली ते पुन्हा बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या कनिष्ठ महाविद्यालयात जीवशास्त्र विषयाचे शिक्षक म्हणून रुजू झाले. विद्यार्थ्यांमध्ये निसर्ग आणि पर्यावरणाप्रती सजगता आणि संवेदनशीलता निर्माण व्हावी या हेतूने त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी 'फ्लेमिंगो नेचर क्लब' ची स्थापना केली. २०११ पर्यंत त्यांनी आपली सेवा प्रदान केली. २०११ मध्ये त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली आणि विद्याविहार येथील सोमैया महाविद्यालयात नव्यानेच सुरू केलेल्या 'पर्यावरण शास्त्र' या विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकवण्यासाठी प्राध्यापक म्हणून जबाबदारी स्वीकारली आणि कालांतराने तेथून निवृत्त झाले. लेखक निसर्गाचे गाढे अभ्यासक असून संबंधित विषयांवर मराठी भाषेत त्यांनी विपुल लेखन केले आहे.

**- डॉ. मानसी देशमुख**
मानसोपचारतज्ज्ञ,
पुणे
भ्रमणध्वनी - +९१ ७८७५७ ३१५१८

•••


# कर्वे दांपत्यांची दोन पुस्तके : आत्मकथने

*महर्षी कर्वे यांचे 'आत्मवृत्त' आणि त्यांच्या पत्नी बाया उर्फ आनंदीबाई कर्वे यांचे 'माझे पुराण' ही दोन्ही आत्मकथने मराठी साहित्यात महत्त्वाची. मात्र काहीशी दुर्लक्षित आहेत. या दोन्ही पुस्तकांवर प्रकाश टाकणारा लेख : संपादक*

महर्षी कर्वे यांचे 'आत्मवृत्त' आणि त्यांच्या पत्नी बाया उर्फ आनंदीबाई कर्वे यांचे 'माझे पुराण' ही दोन्ही आत्मकथने सलग वाचून काढली. त्यातले महर्षी कर्व्यांचे आत्मचरित्र आधी वाचले होते, बाया कर्वेंचे पहिल्यांदाच वाचले आणि परत एकवार प्रकर्षाने जाणवले की, वरवर सामान्य भासणाऱ्या ह्या जोडप्याने एकाच आयुष्यात किती असामान्य काम उभे करून ठेवलेय ते, आणि तेही केवळ इच्छाशक्तीच्या जोरावर, तत्कालीन समाजाशी कधी झुंज घेत, तर कधी सामोपचाराने.

काही वर्षांपूर्वी मी माझ्या लेकीला महर्षी कर्व्यांचे कार्य इतके मोठे का आहे ते समजावत होते. ती तेव्हा चौदा-पंधरा वर्षांची असेल. त्यांचे कार्य समजावून सांगण्यासाठी तत्कालीन समाजातली हिंदू बालविधवांची स्थिती किती दारुण होती हे मुलीला सांगणे जरुरीचे होते; पण तिला ते काही केल्या उमगत नव्हते. 'माझ्याएवढ्या वयात मुलींची लग्ने व्हायची? मग त्यांची शाळा?', 'नवरा मेला म्हणून केस का कापायचे?' 'म्हणजे त्यांनी कधीच घराबाहेर पडायचे नाही? का?', सटासट बंदुकीच्या गोळ्यांसारखे लेकीचे प्रश्न येत होते. तिच्या डोळ्यांत मला राग, अविश्वास, गोंधळलेपण आदी भावनांचे मिश्रण स्पष्ट दिसत होते.

मी १९व्या शतकाच्या उत्तरार्धातील महाराष्ट्रातील हिंदू, विशेषतः ब्राह्मण विधवांच्या कटू वास्तवाची कहाणी सांगत होते, पण लेकीला वाटत होते मी एखादी हजारो वर्षांपूर्वीची, समजायला अवघड असलेली भयकथा सांगत आहे. ती अशा वास्तवाची कल्पनाही करू शकत नव्हती. जिथे कोवळ्या वयाच्या मुलींना लग्न म्हणजे काय हे समजायच्या आत नवरा मेला म्हणून आयुष्यभर घरात डांबले जात असे, डोक्यावरचे केस काढले जात, एकाच रंगाची जाडीभरडी साडी त्यांना नेसायला लावली जात असे आणि हौस-मौज, बाल-सुलभ खेळ वगैरे सोडाच, त्या अश्राप मुलीला दिवसातून फक्त एकदाच जेवायची परवानगी असे. माझ्या लेकीच्या आजच्या वास्तवात हे चित्र कुठेच बसत नव्हते. तिच्यासाठी ह्या छळाच्या कहाण्या म्हणजे सिन्ड्रेलासारख्या परिकथेत सावत्र आई सिन्ड्रेलाचा छळ करते ह्यासारख्या काल्पनिक कथाच होत्या. थोडा




गोड बोलण्याचे सोंग करणारा माणूस कधीही हितचिंतक नसतो!

वेळ तिला समजवायचा प्रयत्न करून मी तो नाद सोडून दिला. वाटलं बरंच आहे ती अशा वास्तवाची कल्पनाही करू शकत नाही ते.

ती आजच्या ज्या मुक्त, धाडसी जगात राहते, जिथे सर्व स्त्रियांना नसला तरी बऱ्याच स्त्रियांना निवडीचा अधिकार आहे, त्या स्वतःच्या करियरचा निर्णय स्वतः घेतात, जगभर फिरतात, आपले मत ठामपणे मांडतात आणि काहीही बनू शकतात त्या जगात अशा छळाच्या कहाण्या अतर्क्य वाटणेच साहजिक आहे. पण आज माझी लेक आणि तिच्यासारख्या लाखो मुली ज्या स्वातंत्र्याचा आनंद घेत आहेत, जो आनंद माझ्या पिढीलाही मिळाला, आमचा शिक्षणाचा हक्क, निवडीचा हक्क–तो आम्ही भांडून मिळवलेला नाही. महर्षी कर्वे यांच्यासारख्या अनेक व्यक्तींनी त्यांच्या जीवनभराच्या अथक परिश्रम आणि त्यागातून आजचे वर्तमान घडवले आहे.

१९व्या शतकातील मुरुडसारख्या छोट्या गावात, अगदी सामान्य आर्थिक परिस्थितीत वाढलेला हा मुलगा, अथक परिश्रम घेऊन स्वकष्टाने शिक्षण घेऊन बी.ए झालेला. शिक्षण पूर्ण होऊन त्यांना पुण्यात फर्ग्युसन कॉलेजमध्ये गणिताचा प्राध्यापक म्हणून नोकरी मिळाली. त्यांच्या जागी इतर कुणीही सामान्य व्यक्ती असती तर त्याने इतक्या कष्टानंतर आलेल्या आर्थिक आणि सामाजिक स्थिरतेचा आनंद घेतला असता आणि 'मी बरा, माझे कुटुंब बरे' अशा वृत्तीने जीवन खर्च केले असते. अगदीच सामाजिक बांधिलकी वगैरेचा कीडा चावला असता तर आपला संसार सांभाळून मग पैसे उरलेच वर तर एखाद्या सामाजिक कार्याला थोडीफार आर्थिक मदतही केली असती. पण इथेच तर कर्व्यांचे वेगळेपण आहे. त्यांच्या आत्मचरित्रात त्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे की, त्यांचे पूर्वज फार श्रीमंत आणि कर्तबगार होते पण त्यांची संपत्ती, कर्तृत्व फार पिढ्या टिकले नाही. त्यांच्या मागे दीर्घकाळ टिकल्या त्या दोनच गोष्टी, ज्या त्यांनी स्वतःसाठी नाही तर समाजासाठी करून ठेवल्या होत्या, मुरुड येथे त्यांनी बांधवून घेतलेले तळे आणि तिथले दुर्गादेवीचे मंदिर.

कदाचित तोच आदर्श डोळ्यांसमोर ठेवून कर्व्यांनी हिंदू विधवांचे पुनर्वसन आणि स्त्री शिक्षण ह्या दोन ध्येयांसाठी आपले संपूर्ण आयुष्य वाहून घेतले असेल. कर्व्यांना हवे असते तर ते फर्ग्युसन कॉलेजमध्ये गणित शिकवत राहिले असते, प्रिन्सिपॉल म्हणून निवृत्त होऊन त्या नोकरीच्या प्रतिष्ठा आणि स्थैर्याचा आनंद घेऊ शकले असते. पण तरुण कर्वे सहृदय होते, त्यांच्या आसपासच्या समाजात त्यांनी हिंदू बालविधवांचे दुःख जवळून पाहिले होते.

जेव्हा कर्वे यांची पहिली पत्नी राधाबाई निधन पावली, तेव्हा त्यांनी त्यांच्या मित्राची बहीण गोदूबाई हिच्याशी पुनर्विवाह केला. गोदू आनंदी झाली आणि कर्व्यांना आपल्या समाजकार्यात एक समानधर्मी धीट सहप्रवासिनी मिळाली. खरे तर आनंदीबाईंचे धाडस हे कर्व्यांपेक्षाही मोठे होते, कारण विधवा पुनर्विवाहाचा क्रांतिकारी निर्णय घेतला जो कर्वे पती–पत्नींनी घेतला. त्याची सर्वाधिक किंमत मोजावी लागली ती आनंदीबाईंना. सामाजिक बहिष्काराचा सर्वाधिक सामना करावा लागला तोही आनंदीबाईंना. कर्व्यांनी जेव्हा हिंगण्याला 'अनाथ बालिकाश्रम' उघडला तेव्हा शिक्षणासाठी तिथे आपल्या मुली पाठवायला तत्कालीन समाज तयार नव्हता. कारण त्यांना आपल्या मुलींना आनंदीबाईंच्या हातचे जेवण खायला द्यायचे नव्हते. आज हास्यास्पद वाटेल, पण त्या काळात आनंदीबाई आश्रमातल्या सर्व मुलींची उस्तवार तर करीत, पण त्यांना कशाला शिवायची परवानगी नव्हती!

पण आनंदी–धोंडो कर्वे विवाह हा केवळ दोन व्यक्तींचा विवाह नव्हता, तर एक समान ध्येयाचा मार्ग

होता. आनंदीबाईंचा आत्मवृत्तांत 'माझे पुराण' अत्यंत साध्या, सोप्या भाषेत अत्यंत प्रांजळपणे त्यांच्या जीवनाची हृदयस्पर्शी कहाणी सांगतो. आधी बालविधवा म्हणून केशवपनाला सामोरे जाणे, नंतर पंडिता रमाबाई ह्यांच्या शारदासदनात प्रथम विद्यार्थिनी म्हणून शिकायला जाणे, नंतर कर्व्यांशी पुनर्विवाह केल्यामुळे झालेला तत्कालीन समाजाचा रोष. अत्यंत ध्येयवादी नवऱ्याबरोबर संसार करताना नर्सिंगचे प्रशिक्षण घेऊन स्वतःच्या हिंमतीवर कुटुंबाची जबाबदारी घेणे आणि त्याचबरोबर कर्व्यांच्या मागे ठामपणे उभे राहणे ह्या सर्वांमधून केवळ त्यांची अदम्य ताकद जाणवत नाही, तर आहे त्या परिस्थितीवर मात करण्यासाठी आयुष्यभर अथक परिश्रम करणाऱ्या एका अत्यंत सशक्त स्त्रीचे दर्शन आपल्याला त्यांच्या आत्मकथनातून होते.

कर्वे पती-पत्नी दोघांचीही आत्मचरित्रे सलग वाचताना दोन गोष्टी सतत जाणवत राहतात, पहिली म्हणजे दोघांचीही व्यक्तिमत्त्वे एकमेकांपासून सर्वस्वी भिन्न असताना देखील दोघांमध्ये असलेली ध्येयाबद्दलची कमालीची एकवाक्यता आणि तत्कालीन समाजाला मान्य नसलेले कटू, क्रांतिकारी निर्णय घेताना सुद्धा समाजाशी स्वतःला संपूर्णपणे तोडून न घेणे. होता होईतो छोट्या गोष्टीत पडते घेऊन हळूहळू समाजमन आपल्या कार्याला अनुकूल करून घेणे ही गोष्ट सोपी नव्हे, तेसुद्धा असा समाज ज्याच्या वेडगळ समजुतीमुळे कर्वे पती-पत्नी दोघांनाही खूप मानसिक त्रास भोगावा लागला. दोघांच्याही आत्मकथनांमध्ये कडवटपणा नाही, सरसकट सर्व समाजाला, धर्माला दिलेली दूषणे नाहीत, पण अन्याय्य रुढींविरुद्धची कळकळ आहे, समाज सुधारणेची तळमळ आहे.

आज कर्वे यांचा वारसा त्यांनी स्थापन केलेल्या संस्था उत्तमरित्या चालवत आहेत. कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या आवारात तुम्ही आज गेलात तर तुम्हाला दिसतात हजारो मुली, निर्भय, चैतन्याने सळसळणाऱ्या, आत्मविश्वासाने वावरणाऱ्या, आपल्या आवडत्या क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या आणि त्यांच्याकडे मूकपणे पहात उभा आहे महर्षींचा पुतळा, एका तप्त, निर्जन मैदानात उभ्या असलेल्या डेरेदार वटवृक्षासारखा, ज्याची मुळे जमिनीत खोलवर पोहोचून अन्न शोधत आहेत, आणि त्याच्या फांद्या प्रकाशाची आस घेऊन पसरलेल्या आहेत.

कर्वे त्या वटवृक्षासारखे आहेत आणि बाया त्याची थंडगार सावली. दोघांच्या आयुष्यभराच्या कार्याने स्त्रियांच्या अनेक पिढ्यांना सावली आणि आश्रय दिला, त्यांच्या दृष्टीकोनाने शिक्षित, सशक्त महिलांच्या रूपाने फळ दिले, आणि त्यांच्या मुळांनी भारतीय समाजाच्या मातीत खोलवर जाऊन रूढींची खडकाळ जमीन भेदून देऊन मूळच्या उदात्त परंपरांच्या झऱ्यांना आवाहन केले.

आज, जेव्हा मी माझ्या लेकीला आणि तिच्या मैत्रिणींना आत्मविश्वासाने भविष्याची स्वप्ने बघताना पाहते तेव्हा मला कर्वे पती-पत्नीच्या अथक परिश्रमांची, त्यांनी केलेल्या व्यक्तिगत त्यागाची आठवण होते आणि माझे हृदय कृतज्ञतेने भरून जाते. महर्षी कर्वे आणि बाया यांचे जीवन हे शांत, स्थिर, चिवट लढाईचे प्रतीक होते. त्यांचे कार्य तोडून-फोडून टाकणारे नव्हते, तर हळू घडणाऱ्या पण अपरिवर्तनीय अशा बदलाची निःशब्द, अविचल आणि आयुष्यभर जोपासलेली बांधिलकी होती.

समाजाला फाट्यावर मारून केलेली क्रांती सोपी असते; पण समाजमन हळूहळू बदलत घडवून आणलेला बदल हा दीर्घकाळ टिकतो!

**– शेफाली वैद्य**
ज्येष्ठ लेखिका
पुणे

●●●

# समुद्र मंथन एक यशोगाथा

*समुद्र मंथन म्हणजे, 'जीवनाचे सार शोधण्याकरिता केले गेलेले आत्म्याचे मंथन' होय. ह्यातील गर्भीतार्थ ध्यानात घेतला पाहिजे. तत्त्वज्ञानी मंडळींनी तो सामान्यजनांना समजावून सांगितला पाहिजे. त्यातील जीवनाचे सार ज्याला कळेल आणि तो जसा वागेल तो यशस्वी ठरेल ! – संपादक*

समुद्र मंथन, एक अद्भुत घटना जी केवळ जादूमय नव्हे, तर आपल्या जीवन प्रवासाशी अत्यंत जवळून निगडित आहे. वर वर पाहता आपल्याला ती अचंबित करून टाकते. अनेक अद्भुत गोष्टींबरोबर जी चौदा रत्ने त्यातून बाहेर आली त्याविषयी आपण ऐकले आहे. क्षीरसागराचे मंथन, अशक्यप्राय वाटणारी गोष्ट; पण आपली पुराणे, महाकाव्ये ही नेहमीच जीवनातील सत्ये अशीच कथानकांतून उलगडत आली आहेत. समुद्र मंथन आपल्या दृष्टीने एक प्राचीन महाकाव्याचा भाग असलेली कथा आहे. परंतु काही दिवसांपूर्वी डॉ. कुमार विश्वास यांचे 'समुद्र मंथन' या विषयावर एक सुंदर विवेचन ऐकायला मिळाले. ही केवळ एक कथा नसून आपल्या आयुष्याशी निगडित अत्यंत महत्त्वाचे टप्पे ह्यात पाहावयास मिळतात. हे कार्य अत्यंत मोठे आणि तितकेच कठीण होते. केवळ सूर नव्हे, तर असुरांनाही अमृत हवे होते परंतु आपल्या मर्यादित क्षमतेची जाणीवही होती आणि एकट्याने हे अमृत मिळवणे अशक्यप्राय आहे हे जाणवल्यामुळे प्रथमच त्यांनी एकत्र येऊन हे आव्हान पेलायचे ठरविले.

क्षीरसागराचे मंथन करायचे म्हणजे साहजिकच घुसळण्यासाठी एका प्रचंड मजबूत रवीची आवश्यकता होती. ती जबाबदारी मंदार पर्वताने स्वीकारली आणि वासुकी, सर्पांचा राजा ह्याने ही मंथनाची प्रक्रिया पार पाडण्यासाठी रवीला वेढणारी दोरी बनण्याचे काम केले. विष्णूने कूर्म (कासव) अवतार धारण केला आणि स्वतःच्या पाठीवर मंदार पर्वत समतोल उभा धारण केला. ब्रह्मदेव (विश्वाचा निर्माता) पर्वताचा तोल सांभाळण्यासाठी पर्वताच्या शिखरावर बसले. जेव्हा जेव्हा मी ही कथा वाचली किंवा त्याविषयी गोष्टी ऐकल्या तेव्हा तेव्हा माझ्या डोळ्यांसमोर हे अलौकिक दृश्य उभे राहिले.

समुद्र मंथन हे एक प्रकारे 'जीवनाचे सार शोधण्यासाठी केले गेलेले आत्म्याचे मंथन' आहे. अमृत हे अमरत्व किंवा चिरतारुण्य बहाल करते. व्यापक दृष्टीने पाहता मनुष्य हा त्याच्या कृतीने आणि कार्यामुळे अजरामर होतो. आपले ध्येय जे आपल्याला जगण्याचे उद्दिष्ट देते त्याची प्राप्ती हेच ते अमृत आणि ते शोधण्यासाठी प्रत्येकाला आपल्यातील आत्मारूपी महासागराचे मंथन करावे लागते.

समुद्र मंथनातून जशी अनेक रत्ने बाहेर पडली तशीच काही प्रलोभनेही समोर आली आणि ती एका विशिष्ट क्रमाने आणि उद्देशाने आली. तो क्रम आणि उद्देश समजून घेणे अतिशय उद्बोधक आहे.

मंथन प्रक्रियेदरम्यान बाहेर आलेली सर्वांत पहिली गोष्ट म्हणजे 'हलाहल', अत्यंत जहाल विष, त्याच्या संपर्कात जे काही आले ते भस्मसात होत गेले आणि ते पचविण्याची ताकत फक्त महादेवाकडे होती. मंथनात आलेला पहिला अडथळा त्यांनी प्रश्न केला नि पचविला. आपण जेव्हा एखादा संकल्प करतो, तेव्हा आपला खरा जीवनप्रवास सुरू होतो. त्यात आपल्याला अनेकदा नकार, निराशा, अपमान आणि इतर अनेक प्रकारच्या

आव्हानांचा सामना करावा लागू शकतो. एकदा का हे हलाहल पचवण्याची क्षमता आपण प्राप्त केली की, आपण पुढील प्रवासासाठी सिद्ध होतो. आपला आत्मविश्वास बळावतो आणि आपल्याला पुढील रत्न प्राप्त होते, ते म्हणजे कामधेनू- गोमाता; जी आपल्याला दूधरूपी पोषण देते आणि आपल्या ध्येयप्राप्तीसाठी मार्ग आणि साधने उपलब्ध करून देते. आपण सर्व कठीण चाचण्यांमधून तावूनसुलाखून बाहेर पडलो की आपल्याला विपुल ज्ञानाचा खजिना प्राप्त होतो. हे ज्ञान आपल्याला आपल्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी सुसज्ज करते.

ह्या प्रवासातील पुढील रत्न म्हणजे 'उच्चैःश्रवस् अश्व;' ज्याला सात डोकी आणि पंख आहेत आणि जो अश्वांचा राजा मानला जातो. आपल्याला प्राप्त झालेल्या ज्ञानामुळे आपल्याला प्रगतीचे पंख प्राप्त होतात आणि गती लाभते जी आपल्याला आपल्या उद्दिष्ट प्राप्तीसाठी मदत करतात.

आपले ध्येय साध्य करण्याच्या दिशेने आपला प्रवास जोमाने आणि वेगाने सुरू झाला म्हणजे आपल्याला लाभतो तो ऐरावत, श्वेत हत्ती, इंद्राचे वाहन, मंथातून उत्पन्न झालेले पुढील रत्न. हत्ती हा अतिशय शक्तिशाली, बुद्धिमान परंतु शांत प्राणी आहे, जो क्षुल्लक अडथळ्यांमुळे विचलित होत नाही. हत्ती त्याच्या स्वतःच्या गतीने चालत असताना त्याच्यावर मागून भुंकणाऱ्या श्वानांची तो पर्वा करत नाही. हे निरर्थक भुंकणारे कुत्रे दुसरे कोणी नसून मत्सरी लोक होत, ज्यांना दुसऱ्यांचे यश पाहवत नाही. बलशाली हत्तीच्या आगमनाने जसे कुत्रे बिथरून जातात, परंतु हत्ती त्यामुळे विचलित होत नाही त्याचप्रमाणे आपल्या ध्येयाकडे वाटचाल करणाऱ्या लोकांना, सामान्य लोकांच्या निंदा नालस्तीने फरक पडत नाही.

आपल्या ध्येयावर नजर ठेवून त्यांचा प्रवास सुरू राहतो आणि त्यातूनच त्यांना पुढील रत्न प्राप्त होते ते म्हणजे 'कौस्तुभ मणी', श्री विष्णूच्या गळ्यातील हारात विराजमान असलेले मौल्यवान रत्न. आपली आपल्या ध्येयाशी असलेली निष्ठा आणि अथक प्रयत्न आपल्याला यश प्राप्त करून देतात.

आपल्याला आपल्या मेहनतीचे फळ मिळते आणि प्राप्ती होते ती कल्पवृक्षाची, आपली मनोकामना पूर्ण होण्यासाठी वरदान देणारा वृक्ष. आपल्या ध्येयप्राप्तीसाठी आपल्याला विविध संधी प्राप्त होतात आणि ह्या संधी वरदान ठरून आपला मार्ग सुकर करतात.

या साधनांमुळे जशी यशप्राप्ती होते तसेच काही प्रलोभनेही येतात, जी आपल्या सचोटीची चाचणी घेतात आणि त्यानुसार ठरतो आपल्या पुढील प्रवासाचा मार्ग !

यशाबरोबर पुढील रत्न येते, 'रंभा-लालसा.' जसजसे आपण यश मिळवू लागतो, तसतसे आपल्याला आपल्या योग्यतेपेक्षा आणि गरजेहून अधिक संपत्ती, सत्ता, अधिकार प्राप्तीची लालसा निर्माण होते. ही लालसा आपल्याला सन्मार्गापासून दूर घेऊन जाते.

ह्या लालसेच्या आहारी न जाता जर आपण आपल्या ध्येयाप्रती वचनबद्ध आणि एकनिष्ठ राहिलो तर आपल्यावर लक्ष्मी प्रसन्न होते आणि तिचा वरदहस्त प्राप्त होतो. जेव्हा एखादी व्यक्ती कठोर परिश्रम आणि प्रयत्नांद्वारे संपत्ती कमावते, तेव्हा ती नम्र आणि आपल्या मूल्यांशी एकनिष्ठ राहते, परंतु लोभाने जर नैतिक मर्यादा ओलांडली तर ती लालसा शमविण्यासाठी मनुष्य अनेक अनैतिक मार्गांचा वापर करू लागतो. त्यापैकी एक म्हणजे मंथनातून उत्पन्न झालेली 'वारुणी' (मद्य- सारासार विचार शक्तीचा लय) जेव्हा एखादी व्यक्ती अप्रामाणिक साधनांचा वापर करून शक्तिशाली आणि श्रीमंत बनते तेव्हा ती अहंकाराच्या आहारी जाते आणि तिच्या वागण्यात उन्मत्तता येते आणि ती व्यक्ती सद्सदविवेकबुद्धी गमावून बसते, एखाद्या मद्यपीप्रमाणे स्वतःचे भान हरपून बसते.

परंतु, जर आपण रंभा आणि वारुणी यांना वरचढ होऊ न देता, वासना, लोभ ह्यांवर नियंत्रण करून पुढे जाऊ शकलो तर आपणांस पुढील रत्न प्राप्त होते ते म्हणजे 'चंद्र'. चंद्राचा प्रकाश नेहमीच शीतल आणि सौम्य असतो. चंद्र प्रकाशात किंवा त्याच्याकडे पाहून जसे आपल्याला शांत वाटते त्याचप्रमाणे मोह आणि उन्मत्तता ह्यांवर मात केल्यावर, आपला स्वभाव चांदण्यासमान सौम्य आणि शीतल बनतो. आपला शांत विवेकी स्वभाव आपल्याला यशाच्या मार्गावर पुढे घेऊन जातो आणि आपल्या चांगल्या कार्याची कीर्ती हळूहळू लोकांपर्यंत पोहोचू लागते.

समुद्र मंथनातून उपजलेले पुढील रत्न म्हणजे प्राजक्त. प्राजक्ताची फुले जरी अतिशय नाजूक असली तरी त्यांचा सुगंध अतिशय दूरवर दरवळतो. आपल्या कार्याचा सुगंध देखील हळूहळू सर्वत्र पसरत जातो.. आपल्या प्रसिद्धीची सर्वत्र प्रशंसा होऊन जनमानस आपल्या कार्याची दखल घेऊ लागतात. मंथनातून प्राप्त झालेले पुढील रत्न म्हणजे 'पंचजन्य शंख' असे म्हटले जाते की, भगवान श्रीकृष्ण जेव्हा शंखनाद करीत तेव्हा तो नाद आकाश, पातळ आणि पृथ्वीलोक ह्या तिहींना व्यापून टाकत असे. त्याचप्रमाणे, आपले नाव, यश आणि कीर्ती जगभरात प्रतिध्वनित होते.

जेव्हा एखादी व्यक्ती सर्व प्रलोभनांवर आणि दुर्गुणांवर मात करून मिळवलेल्या यशाला सामोरे जाण्यासाठी परिपक्व होते आणि विनम्रता प्राप्त करते तेव्हा स्वतः धन्वंतरी अमृत कलश घेऊन प्रकट होतात. 'हे अमृत म्हणजे आपले शुद्ध अंतःकरण, आचरण आणि प्रांजळ हेतू हे होत.' आपले कार्य आणि जीवन-प्रवाह संपूर्ण मानवजातीच्या कल्याणावर अधिक केंद्रित होतो. जो कोणी अशा व्यक्तीच्या संपर्कात येतो त्याची आपोआप सर्व समस्यांपासून मुक्तता होते आणि त्यांनाही योग्य दिशा लाभते. अशा थोर लोकांच्या सहवासाने आपल्या सर्व चिंता दूर होतात. अशा व्यक्ती अजरामर होतात आणि त्यांचे नाव सुवर्णाक्षरांनी इतिहासात नोंदले जाते.

समुद्र मंथन प्रक्रियेचे आपल्या जीवनाशी असे सुरेख साधर्म्य आहे. ह्या कथेतून मला झालेला बोध म्हणजे -

१. जर हेतू उदात्त असेल तर शत्रूची किंवा प्रतिस्पर्ध्याची मदत घेण्यास संकोच करू नये.

२. परंतु त्यांच्या हेतूबद्दल आणि कृतीबद्दल सतत जागरूक आणि सतर्क रहावे.

३. आयुष्य आपल्याला बरेच काही देते, परंतु त्यातून काय घ्यायचे ह्याची निवड सर्वस्वी आपण करायची असते.

४. आयुष्यात अनेक प्रलोभने आपल्याला मोहाच्या जाळ्यात ओढू शकतात जी अप्रत्यक्षरीत्या आपल्या पतनाचा मार्ग ठरू शकतात आणि ती वेळीच ओळखता येणे आवश्यक आहे.

५. आपले यश किंवा अपयश हे पूर्णपणे आपण निवडलेल्या पर्यायांवर अवलंबून असते.

६. यश कितीही सुंदर आणि विशाल असले तरी जसा प्रत्येक गोष्टीला अंत असतो तसा त्याचाही अस्त होऊ शकतो, त्यामुळे यशाने भारावून जाऊन आपले उद्दिष्ट विसरू नये.

७. आपल्याला प्राप्त झालेले ज्ञान, यश, आत्मिक बळ ह्यांचा वापर इतरांच्या मदतीसाठी आणि कल्याणासाठी केल्याने आपल्याला आंतरिक शांततारूपी अमृताची प्राप्ती होते.

**- आसावरी कुळकर्णी**

●●●

# ‘A La Carte अलास्का’

*मे २०२४ मध्ये पृथ्वीवरील नंदनवन ‘अलास्का’ प्रदेशाची सफर केली. ही सहल आयोजित करण्यापासून, ते सहल पूर्ण होईपर्यंत खूप आनंद मिळाला. तो सर्वांबरोबर वाटून द्विगुणित करावा असं वाटलं, म्हणून हा लेखप्रपंच. सात दिवसांच्या या रम्य सफरीचं वर्णन मी ‘A La Carte अलास्का!’ या शीर्षकाअंतर्गत सात लेखांत प्रस्तुत करू इच्छिते. – संपादक*

## १. तयारी आणि अलास्कात आगमन

मला स्वप्नं बघायला आवडतं. रात्रीची नव्हे, तर दिवसा पाहिलेली स्वप्नं! मला वाटतं, जगण्याची नवी उमेद देतात ती! सुमारे वर्षभरापूर्वी मी असंच एक स्वप्न बघितलं. मला मुळातच हिममय प्रदेशांबद्दल आकर्षण आहे. शिवाय डॉ. दीपा कित्तूर यांचं ‘अनोखा अलास्का’ हे पुस्तक वाचलं, आणि या प्रदेशाबद्दलचं कुतूहल जागं झालं. अजूनही एक दोन पुस्तकं वाचली. गूगल बाबा पण होताच माहिती पुरवायला! आपणही हा रमणीय प्रदेश ‘याची देही याची डोळा’ पहावा असं स्वप्न मी बघू लागले.

अमेरिकेच्या पश्चिमोत्तर दिशेला वसलेले हे राज्य! अलास्का म्हणजे ‘महान भूमी’. पूर्वेला कॅनडा देशाचे युकॉन व ब्रिटिश कोलंबिया प्रांत, पश्चिमेला बेरिंगची सामुद्रधुनी, उत्तरेला आर्क्टिक महासागर व पश्चिम व दक्षिणेला प्रशांत महासागराने हे राज्य वेढलेले आहे. इ. स. १८६७ साली अमेरिकेने अलास्का प्रदेश रशियन साम्राज्याकडून बहात्तर लाख डॉलर्स इतक्या नगण्य किंमतीला विकत घेतला, तेव्हापासून पृथ्वीवरील अत्यंत सुंदर प्रदेशापैकी एक, असा हा प्रदेश, अमेरिकेचे एकोणपन्नासावे राज्य म्हणून मान्यता पावला.

भौगोलिकरीत्या अलास्काचे सहा भाग केले जातात. उत्तर दिशेचा साधारण एक तृतीयांश भाग म्हणजे कडाक्याची थंडी असलेला आर्क्टिक प्रदेश; पश्चिमेकडील काही बेटे त्या मानाने थोडी कमी थंड. अलास्कातील मध्य आणि दक्षिण भागातील प्रदेशांत उन्हाळ्यात चांगला सूर्यप्रकाश असतो. तसेच उबदार हवामानामुळे हे भाग बऱ्यापैकी राहण्यायोग्य आहेत. आम्ही चार रात्री अँकरेज व दोन रात्री सुवर्ड मध्ये राहिलो. आम्ही राहिलो व फिरलो तो भाग दक्षिण अलास्कात येतो.




**अलास्का नकाशा**

जसजशी मी अलास्काबद्दल वाचू लागले, नवनव्या गोष्टी कळू लागल्या तशी अलास्काच्या अधिकाधिक प्रेमात पडू लागले. अलास्का सहल आपण विविध प्रकारे करू शकतो. अमेरिकेमध्ये मोटरकार भाड्याने घेऊन सहली आखल्या जातात. त्यानुसार अलास्का पूर्णपणे ‘बाय रोड’ बघता येतं. अलास्कामधील महत्त्वाची शहरे रेल्वे मार्गाने जोडली गेली आहेत. पूर्णपणे रेल प्रवास करून येथील निसर्ग सौंदर्य आपण अनुभवू शकतो. अलास्काला सहाशे चाळीस मैलांचा सागरी किनारा लाभला आहे! त्यामुळे नामांकित पंचतारांकित क्रूजनेही

आपण जे पेरतो, तेच उगवतं.

प्रवास करता येतो. मात्र सर्व क्रूजशिप्स कॅनडा मधून जातात. त्यामुळे अशा सहलीसाठी अमेरिका व कॅनडा या दोन्ही देशांचा व्हिसा आवश्यक आहे. या सगळ्यांचे मिश्रण असलेली सहलही आयोजित करता येते.

अलास्का सहलीचे नियोजन करताना महत्त्वाचा प्रश्न होता खर्चाचा. मुळातच अमेरिकावारी खर्चिक! त्यात अलास्का हे यूएसए मधलं अतिशय महागडे म्हणून ओळखले जाणारे राज्य. त्यामुळे 'बजेट किती?' हा महत्त्वाचा प्रश्न होता. शिवाय अलास्का हे क्षेत्रफळानुसार अमेरिकेतील सर्वांत भव्य राज्य आहे. 'सतरा लाख, सतरा हजार, आठशे छप्पन' स्क्वेअर किलोमीटर एवढा मोठा भूभाग ते व्यापते. त्यामुळे पूर्ण अलास्का एकाच सहलीत फिरणे महाकठीण! दोन-अडीच महिन्यांची मोठी सफरच मग आखायला हवी. अथवा आपल्या सहलीचा कालावधी ठरवून अलास्काचा विशिष्ट भाग पाहता येतो. माझा 'जर्सी सिटी' मध्ये राहणारा भाऊ आणि मी एकत्र सहल आयोजित करत होतो. माझी आई, वहिनी आणि साडे-तीन वर्षांचा छोटा भाचा हे बरोबर असणार होते. हे सर्व लक्षात घेऊन सगळ्यांना झेपेल आणि रुचेल अशा सहलीचे नियोजन करण्याचा आम्ही प्रयत्न केला.

सर्वप्रथम अलास्का सफरीमध्ये कोणकोणत्या गोष्टी आम्ही अनुभवू शकू याचा प्रामुख्याने विचार केला. आठ दिवसांच्या पर्यटनात खूप मोठा प्रदेश न बघता, अनुभवात नावीन्य आणि वैविध्य येईल अशा पद्धतीने नियोजन केले. हा प्रदेश आमच्यासाठी नवखा असल्यामुळे विविध टूर ऑपरेटर्स द्वारा उपलब्ध असलेल्या अनेक सहलींचा सुद्धा आढावा घेतला. काही आमच्या आर्थिक गणितात बसत नव्हत्या; तर काही जून मध्ये होत्या. आम्हाला तर मे महिन्यात सहल अनुभवायची होती. त्यामुळे आम्हीच आम्हाला हवी तशी 'tailor-made' सहल आखली. शिवाय आमची सहल दर्जामध्ये कोणतीही तडजोड न करता टूर्सच्या सहलींपेक्षा अर्ध्या किंमतीत बसली.

हा नितांत सुंदर प्रदेश कधीही बघितला तरी मनमुराद आनंद देतो; हे जरी खरे असले तरी सहल कधी आखायची हा अजून एक मुद्दा! मे ते सप्टेंबर दरम्यान येथे उन्हाळा असतो. तेव्हा तापमान साधारण चार ते वीस डिग्री सेल्सियस असू शकते. बहुतेक टूर ऑपरेटर्सच्या सहली याच काळात असतात. सुंदर हवामान व बेताची थंडी यामुळे सहलीची पुरेपूर मजा लुटता येते. अलास्का हा ध्रुवीय प्रदेश असल्यामुळे या काळात येथे दिवस मोठा असतो. अलास्का मधील काही भागांत तर सुमारे ऐंशी दिवस सूर्य मावळतच नाही. म्हणजे मध्यरात्री सुद्धा लख्ख प्रकाश असतो! ही अपूर्वाई खास अनुभवण्यासाठीही अनेक लोक उन्हाळ्यातील सहली आखतात. आम्ही मे च्या सुरुवातीला येथे होतो. रात्री साडे-दहाच्या सुमारास सूर्य मावळायला लागायचा आणि पहाटे साडे-चारलाच उगवायचा. हळूहळू हा रात्रीचा कालावधीही कमी कमी होत जातो, आणि 'Midnight Sun'- 'मध्यरात्रीचा दिनकर' बघायला मिळतो. शिवाय दिवस खूप मोठा असल्यामुळे सहलीचा आनंद जास्त काळ लुटता येतो.

अलास्कातील गोठवणाऱ्या थंडीचा अनुभव घ्यायचा असेल तर हिवाळ्यातील सफर करता येते. या काळात दिवस खूप छोटा असतो; व काही काळ, साधारण सदुसष्ट दिवस तर सूर्य उगवतच नाही. ध्रुवीय प्रदेशाची खासियत- 'ध्रुवीय प्रकाश', म्हणजे 'Northern Lights', या काळात रात्र मोठी असल्यामुळे विशेषत्वाने अनुभवता येऊ शकतो.

आम्ही आमची सहल हिवाळा संपताना आणि उन्हाळ्याच्या पूर्वसंध्येला आखली. त्यामुळे उत्तम हवामान व मोठा दिवस आम्हाला अनुभवता आला. आमच्या संपूर्ण सहलीत तापमान साधारण शून्य ते दहा डिग्री सेल्सियस एवढे होते. विमान प्रवास, रेल्वे प्रवास, हॉटेल्स

इत्यादी महत्त्वाची आरक्षणे सुमारे दोन महिने आधीच आम्ही केली होती.

नऊ मे रोजी सकाळी सात वाजता विमानाने न्यू यॉर्क विमानतळावरून सियाटल या अलास्का जवळील शहरासाठी उड्डाण केलं; आणि माझ्या अलास्का नावाच्या स्वप्नाने गगनभरारी घेतली!

सुमारे बारा तासांचा प्रवास करून, सियाटलला विमान बदलून, अँकरेजच्या स्थानिक वेळेनुसार दुपारी साधारण सव्वा-तीनच्या सुमारास आम्ही विमानतळावर उतरलो. विमान उतरतानाच खिडकीतून बाहेर बघितलं आणि सगळीकडे बर्फाच्छादित डोंगर दिसू लागले. तापमान साधारण पाच डिग्री सेल्सिअस होतं. अँकरेज हे अलास्कातील एक अत्यंत महत्त्वाचे शहर. 'turnagain arm' व 'nick' हे नद्यांचे प्रवाह, आणि 'cook inlet' यांच्या कुशीत वसलेलं हे नयनरम्य द्वीपकल्प. 'जुनू' जरी अलास्काची राजधानी असली, तरी अलास्कामधील सुमारे चाळीस टक्के लोकसंख्या अँकरेज मध्ये वसलेली आहे. निसर्गसौंदर्याचं लेणं ल्यालेलं आणि त्याचबरोबर बऱ्यापैकी शहरीकरण झालेलं हे ठिकाण. अनेकदा येथील स्थानिक लोकांना शहरीकरण फारसं रुचत नाही आणि 'Anchorage is the nearest city to Alaska!' असं गंमतीने म्हटलं जातं. मला मात्र हे ठिकाण खूपच आवडलं. येथे मी अलास्काच्या प्रथमदर्शनी प्रेमातच पडले म्हणा ना! म्हटलं तर मोठे भव्य रस्ते, मोठ्या रेस्टॉरंट चेन्स इत्यादींमुळे शहरीकरण नजरेत भरतं; पण कोठेही उभं राहून लांबवर नजर टाकली की बर्फाच्छादित हिमशिखरे खुणावतात.

टॅक्सी घेऊन हॉटेलवर आलो. फक्कड चहा घेतला, थोडे निवांत बसलो, आणि काय! बाहेर हिमवर्षाव सुरू झाला. मी मुंबईची मुलगी! हिमवर्षाव कधीच अनुभवला नव्हता. पटकन थंडीपावसापासून संरक्षण देणारं जॅकेट चढवलं आणि सगळे बाहेर आलो. डॉक्टर मीना प्रभू त्यांच्या प्रवास वर्णनात अनेकदा म्हणतात, 'प्रवासिनी देवीची' त्यांच्यावर विशेष कृपा आहे. मलाही आत्ता तसंच वाटलं. आत्तापर्यंतचं नियोजन व प्रवास कुठलाही अडथळा न येता पार पडला होता, ज्याचं श्रेय नक्कीच माझ्या भावाला प्रकर्षाने जातं. आमच्या स्वागतासाठीच जणू हा हिमवर्षाव होत होता असं वाटलं. गोठवणारी थंडी व हिमवर्षावाचा मनमुराद आनंद लुटला; आणि आम्ही जेवायला बाहेर पडलो. किनारी प्रदेश असल्यामुळे अलास्कामध्ये मांसाहारी लोकांची चंगळ असते. इथला 'साल्मन बेक' तर जगप्रसिद्ध. शाकाहारी लोकांसाठी मात्र मोजकेच पर्याय उपलब्ध आहेत. एवरेस्ट रेस्टॉरंट मध्ये गरमागरम भजीवर ताव मारला, तुडुंब जेवलो, आणि हॉटेलवर येऊन गाढ झोपी गेलो!



अँकरेजमधील स्वागतासाठीचा हिमवर्षाव!

**संदर्भ:**


- कित्तूर, दीपा (२०१०). 'अनोखा अलास्का'. प्राजक्त प्रकाशन.
- प्रधान, जयप्रकाश (२०१४). 'ऑफबीट भटकंती' (भाग ३). रोहन प्रकाशन.
- अलास्का नकाशा: https://www.nationsonline.org/oneworld/map/US-/alask_map.htmgoogle_vignette



**- डॉ. जयश्री पवार**

सहाय्यक प्राध्यापिका

जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विभाग

बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे

# उंटांची अद्‌भूत रम्य दुनिया
# २०२४ हे आंतराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष

*प्रस्तुत लेखाच्या शीर्षकावरून 'उंट' या प्रजातीची माहिती वाचण्याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात निर्माण नक्कीच झाली असेल! वाचा तर... - संपादक*

**अंजी-की-धानी-**

विसाव्या शतकाच्या सुरवातीला १०००० उंट होते. चाळीस वर्षांपूर्वी ५००० उंट होते. आता गावांत १००० उंट आहेत. आणखी दहा वर्षांनी उंट शिल्लक राहाणार नाहीत.

रुपाराम रायका अंजी-की-धानी.

गॅरी, जॉन व आएशा विमानाने उदयपूरला येतात. हणमंतसिंगच्या गाडीने सगळे साद्रीला येतात. डॉ. देवाराम उत्साहाने पुढचे प्लॅन बनवतो. त्याच्यामते तिने मारू रायकांना भेटणे जास्त गरजेचे होते. मारू रायका हे उंटांचे खरे प्रजनक आहेत. गोदवारच्या रायकांनी फक्त शंभर वर्षांपूर्वी उंट पाळायला सुरवात केली. डॉ. देवारामला त्यांना अंजी-की-धानी या गावात घेऊन जायचे असते. त्या गावात हजारो उंट असतात. हणमंतच्या गाडीत विनय व सर्वजण दाटीने बसतात. अंजी-की-धानी हे अतिशय सुस्त गाव असते जेथे काळ जणू थांबलेलाच असतो !

गावाच्या प्रवेशद्वाराशी ओळींत पांढरे स्मरणार्थ दगड असतात. त्यावर त्यांचे आदरणीय पूर्वज उंटावर बसलेले असतात. त्यांच्या बाजूलाच भव्य कडुलिंबाच्या झाडाभोवती मोठ्या कट्ट्यावर वृद्ध माणसे आराम करत असतात. तो कट्टा येणाऱ्या पाहुण्यांसाठी करमणुकीसाठी बांधलेला असतो. कोणीतरी वाफाळलेला उंटाच्या दुधाचा चहा आणून देतो. देवाराम त्यांच्या येण्याचे कारण सांगतो. तिच्या मुलांच्या तपकिरी केसाने व गोऱ्या कातडीने सर्वांची उत्सुकता वाढते. मुले रायकांच्या मुलांत खेळायला जातात. ती मुले मातीचे उंट करतात.

तेवढ्यात देवारामला समजते की, येथील उंट वीस कळपांत विखुरलेलं आहेत. ते वेगवेगळ्या जागी चरत असतात व वर्षातून फक्त एकदा होळीच्या वेळेस अंजी-की-धानीला येतात. ती खूप निराश होते. त्यांच्यातील एक तिला सांगतो की, त्याचा तोला (कळप) जवळच रात्री मुक्कामाला आहे. ते सकाळी सात वाजेपर्यंत त्यांना बघायला येऊ शकतात. ते डॉ. देवारामकडे रात्रीचा मुक्काम करायचे ठरवतात. डॉ. देवाराम पचुंदा कलान नावाच्या गावात राहत असतो. त्याचे छोटे घर छान असते. त्याचे आई-वडील व दोन मुले व बायको राहतात. शेजारीच त्याच्या तीन भावांचीही घरे असतात. ते मेंढ्यांना घेऊन फिरतीवर असतात. डॉ. देवारामच्या नात्यातल्या सर्व बायका तिला भेटायला उत्सुक असतात व तिलाही त्यांच्याशी मैत्री करायची असते. बायकांचा व मुलींचा घोळका तिची वाट बघत असतो. त्या तिला घेरतात. तिच्या कपड्यांना हात लावून बघतात. तिचे गालगुच्चे घेतात. मोठ्यांदा बोलतात. एकजण मोठ्या गोणीत असलेले चांदीचे दागिने ओढत आणते. त्या अनेक प्रकारचे दागिने घालतात. रंगीबेरंगी कपडे घालतात. ओढण्या घेतात. तिला अनेक फोटो काढायला लावतात. तरी त्यांचे समाधान होत नाही. त्यांचा उत्साह ओसंडून जात असतो. शेवटी ती दमते.

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून ते ठरवलेल्या जागी येतात. अडोजीचा देखणा मुलगा गौतमराम गुलाबी

फेट्यात त्यांची वाट बघत उभा असतो. त्याची गाडी खडबडीत धुळीच्या रस्त्यावरून बाभळीच्या जंगलातून जाते. त्याचा उंटांचा कळप तोला, चौधरीच्या मोहरीच्या कापणी केलेल्या शेतात असतो. काही उंट त्यांचा कडबा रवंथ करत असतात तर काही उभे असतात त्याचे बांधलेले पाय सोडायची वाट बघत. नवीन जन्मलेली वासरे बागडत दुडदुड उड्या मारत होती. आवाज करत आपल्या आजूबाजूचा प्रदेश न्याहाळत होती. त्यांच्यामध्ये वेगवेगळ्या रंगांचे फेटे घातलेली माणसे होती. त्यांच्यातला पिवळा फेटा घातलेला अडोजी होता. त्याने त्यांना शेताच्या टोकाला असलेल्या शेकोटीशी जायला सांगितले. त्याने यांच्यासाठी बसायला भाकल (उंटाच्या केसापासून बनवलेली सतरंजी) घातले व ताज्या चहासाठी उंटाचे दूध काढायला सांगितले.

जॉन व आयेशा त्यांच्या आईला धावत-धावत सांगत आले की, एक मादी उंट नवीन पिल्लाला जन्म देत होती. एका बाभळीच्या झाडाच्या सावलीत एक मादी उंट नवीन वासराला जन्म देत होती. एक रायका तिच्याशी अतिशय सौम्य व समजावणीच्या सुरांत बोलत होता. अगदी काही मिनिटांतच नवीन वासराचा जन्म झाला. इल्सच्या मते हे उंटाचे बाळंतपण इतर प्राण्यांच्या तुलनेने अतिशय जलद व दुःखरहित होते. ते नवीन जन्मलेले अभ्रक त्याच्या उंच व बारीक पायांवर उभे राहण्याचा लगेच प्रयत्न करीत होते, पण ते खाली पडते. अर्ध्यातासाने परत धडपडत उभे राहायचा प्रयत्न करते, पण पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे खाली पडते.

तोपर्यंत बाकीच्या कळपाची चरायला जायची वेळ झालेली असते. ते रात्रीच्या मुक्कामाला परत तेथे येणार असतात. हे उंटांचे कळप एका ठिकाणी कधीही दोन दिवसांपेक्षा जास्त दिवस मुक्काम करत नाहीत. त्यामुळे सतत नवीन जागेच्या शोधात रहावे लागे. हे काम अडोजीचे होते. त्याचे जमीनदारांशी दीर्घकालीन संबंध होते. ते त्याच्या उंटांना बोलवत असत. कारण त्यांना उंटांचे शेण मिळत असे. त्या बदल्यात अडोजीला पैसे मिळत असत.

होळीच्या वेळी हे सर्व उंट अंजी-की-धानीला एकत्र येत असत. त्यांची लोकर कापण्याचा कार्यक्रम असे. सर्व गावकरी आपापल्यापरीने मदत करत. अडोजीने त्यांना अतिशय आग्रहाने परत होळीला यायचे आमंत्रण दिले. त्यावेळेस अंजी-की-धानीला २००० ते ३००० उंट जमा होतात. 'होळी' हा सण हिवाळ्याचा शेवट व उन्हाळ्याची सुरवात दर्शवितो. हा सण रंगांची उधळण करून साजरा केला जातो.

या वेळेला अडोजीबरोबर विचारांची अविस्मरणीय देवाण-घेवाण होते व ती लांबून सुरक्षित शैक्षणीय अंतर ठेवून बघणारी व सहानुभूती दाखवणारी न रहाता सक्रीय भागधारक होते. अडोजीचा त्याला व त्याच्या संघटनेला मदत करण्याची विनंती तिच्या डोक्यात घुमत राहते. त्याचे म्हणणे तिला पटते की, फक्त फोटो घेऊन काय फायदा? तिने कॅम्प घ्यावेत. तिला खरोखरच समजत नाही की कसले कॅम्प घ्यायचे ? तिला मिळणारे अनुदान अतिशय तुटपुंजेच असते. तिला वाटते की, या सगळ्यासाठी तिला त्यांच्या समस्यांविषयी माहिती, आकडेवारी लागेल जी तिच्याजवळ नसते. ते साद्रीला परत आल्यावर माहिती गोळा करायला लागतात.

विनय अनेक लोकांशी बोलून तिला माहिती मिळवण्यासाठी मदत करतो. साद्रीच्या आसपास मिळून ५००० उंट असतात. पण मागील दहा वर्षांपासून त्यांना चरायला जागा मिळणे कठीण होत जाते. यांचे मुख्य कारण म्हणजे जास्त, जास्त खोल विहिरी खणल्या जात होत्या जेणेकरून शेतकऱ्यांना दोन किंवा तीन सुद्धा पिके घेता येतील. पडीक जमीन, चराऊ कुरणे कमी झाली होती. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, सर्व गावांची

स्वतःची चराऊ जमीन असे तिला 'गोचर' म्हणत. पण अशा जमिनीकडे संपूर्ण दुर्लक्ष होते व ती जागा झुडुपांनी व्यापते जी गुरांना खाण्यासाठीं योग्य राहत नाही. मुख्य संकट पावसाळ्यात येते. पूर्वी पावसाळ्यात जेव्हा शेतात पिके घेतली जात तेव्हां शेकडो वर्षं उंट आरवली पर्वतांच्या जंगलांत चरत, पण आता साद्रीच्या आजूबाजूची जंगलं, 'वन्य अभयारण्य' म्हणून घोषीत होतात व ती कुंभलगड अभयारण्याचा भाग होतात. त्यामुळे तेथे चरण्यांस बंदी येते.

भालाराम रायका त्यांना सांगतो की, हे संकट १९७५ पासून आणीबाणीच्या काळात सुरू होते. सरकार वीस सूत्री कार्यक्रम अंमलात आणते. त्यात एक कलम असे असते की, जंगलांना संरक्षण व नर्सरीची स्थापना. सरकार सर्व चराऊ जनावरांवर पैसे आकारायला लागते. चराऊ उंटांवर दिवसाचा २.५ इतका कर आकारला जातो. नव्वद साली सर्व चराऊ जनावरांवर जंगलांत बंदी आणण्यात येते. पुढचे सरकार ती बंदी उठवते. पण बंदिस्त जंगलाचा भाग उघडला जात नाही. असा गोंधळ चालू रहातो.

रायका जागतिक बँकेच्या प्रोग्राम विषयी तक्रार करतात तेव्हा त्यांना 'मेंढ्यांची संख्या कमी करा व तुमच्या मुलांना शिकवा' असे उत्तर मिळते. त्यांची जनावरे जंगलात चरतांना आढळली तर जप्त केली जातात. ती जमेल तशी माहिती गोळा करायचा प्रयत्न करते. या सर्व अडचणी समजून घेण्यासाठी.

एका नावाने ती मोहित होते ते म्हणजे, राजपूत हिरो पाबुजी. स्थानिक पौराणिक कथेनुसार पाबुजी हा पहिल्यांदा उंट राजस्थानमध्ये आणतो. डॉ. देवाराम तिला त्याच्या गावातल्या पाबुजीचं छोटेसे देऊळ दाखवतो.. उंटांविषयी कोणतीही नवीन गोष्ट करताना मारू रायका प्रथम प्रसाद ठेवतात. पाबुजीने उंट राजस्थानात कसे आणले याचे उत्तर फक्त भोपा सांगू शकेल असे विनय व डॉ. देवाराम सांगतात. ते तिला सांगतात की, भोपा या लोकांना पाबुजीची पूर्ण कथा माहीत आहे. ते पाबुजींचे पुरोहित असतात. त्यांच्याकडे कापडाची लांब गुंडाळी असते. त्याच्यामध्ये पाबुजीच्या जीवनातील अनेक प्रसंगांचे चित्रण असते. त्याला 'पार्ह' असे म्हणतात. त्याला 'हलणारी वेदी किंवा पवित्र जागा' म्हणतात. ती फक्त रात्रीच उघडली जाते.

साद्री जवळच्या एका गावात एक भोपा रहात असतो. तो फक्त कापडाचा स्क्रोल (गुंडाळी) उघडून दाखवायला तयार नसतो. त्याला पूर्ण प्रयोग दाखवायचा असतो. एका गावातील एक उंट आजारी असतो. त्याच्या मालकाने भोपाला त्यांच्या गावात प्रयोगासाठी बोलावले असते. पण त्याच्याकडे पैसे नसतात. पाबुजीची पूर्ण गोष्ट दाखवायला चौदा रात्री लागल्या असत्या. म्हणून ते पाबुजीच्या आयुष्यातील एक प्रसंग निवडतात.

**लाल व तपकिरी रंगाचे मादी उंट राजस्थानात आणण्याची गोष्ट.**

भद्रासला गावाच्या देवस्थानाच्या मोकळ्या जागी ती व हणमंत भोपा व भोपीला आणायला जातात. ते खरोखरच अतिशय गरीब असतात. हे त्यांच्या जुन्या कपड्यांकडे पाहून तिला जाणवते. तिन्ही सांजेला ते गावात येतात. पूर्ण गाव तो प्रयोग बघायला गोळा झालेला असतो.

संगीत, गाणे, नाच व पठण, तिला व लहान मुलांना मंत्रमुग्ध करते. तिला त्यातील एकाही शब्दाचा अर्थ कळत नाही. विनय तिला अर्थ सांगण्याचा प्रयत्न करतो.

एकदा पुष्करला भेट दिली असताना पाबुजी त्याच्या पुतणीचे लग्न गोगाजी चौहाण याच्याशी जमवतो. पाबुजी

तिला लग्नाची काहीतरी असामान्य भेट द्यायचे कबूल करतो. तो तिला लाल व तपकिरी रंगाचे मादी उंट द्यायचे कबूल करतो. ते कुठे मिळतील हे त्याला माहीत नसते. तो हरमल रायकाला रावणाच्या लंकेत पाठवतो. तो संन्याशाच्या वेशांत जातो.

रावणाचे सैनिक त्याला पकडतात. तो त्यांच्याकडे थोडे दूध मागतो. ते सांगतात की, त्याच्याकडे फक्त लाल व तपकिरी मादी उंटाचे दूध आहे. हरमल रायका राजस्थानला परत येतो व पाबुजीला उंटांविषयी सांगतो. पाबुजी रावणाचा पराभव करतो व सातशे दूध देणारे व सातशे इतर उंट घेऊन येतो.

त्यानंतर एप्रिल चालू होतो. अतिशय गरम होऊ लागते. ती लडाखला थंड हवेत ट्रेकिंगला जाते. ती पुस्तकाच्या सहाय्याने हिंदी शिकण्याचा प्रयत्न करते. तिला परत एकदा राजस्थानला शेवटची भेट देऊन सगळयांचा निरोप घ्यायचा असतो व तिला अपराधीपणाची भावना मनातून काढून टाकायची असते. ती तिच्या नुकत्याच शिकलेल्या हिंदीत अतिशय काळजीपूर्वक हणमंतला पोस्टकार्ड टाकते व जोधपूर एअरपोर्टला बोलावते. ती साद्रीला डॉ. देवारामला भेटते. ते रायकांसाठी काय करता येईल यावर विचार करतात. डॉ. देवाराम सांगतो की, त्याला त्याच्या जातीसाठी एक सोसायटी तयार करायची आहे. त्याची जात अतिशय मागासलेली आहे. त्यांना सुधारायची गरज आहे.

त्यांच्या बायकांना स्वच्छतेचे धडे द्यायची गरज आहे. तसेच महिलांना पैसे मिळविण्याचे साधनही द्यायला हवे. इल्स सांगते की, त्यांच्या उंटांना औषधे द्यायची गरज आहे. ती तेथून डॉ. खन्नांना भेटायला बिकानेरला जाते. त्यांना तिच्या संशोधनाची प्रत देते. नंतर ती जयपूरला जायला निघते. बाहेर वातावरण भट्टी सारखे गरम असते. रात्री ती तेथील संस्कृती व रितीरिवाजांवर विचार करते व अजूनही तिला स्वतःला ती उपरी असल्यासाखे वाटते. राजस्थानी जेवण तिला कधीच मानवत नाही. कारण मिर्ची व तुपाचा खूप वापर. त्यामुळं केळी, पार्ले बिस्कीट्स व अनेक चहाचे कप यावरच ती राहते. आणखी एका गोष्टीचे तिला आश्चर्य वाटते म्हणजे कोणीच आपल्या भावना व्यक्त करीत नाही.

अनेक दिवसांनी डॉ. देवाराम त्याच्या घरी जातो तेव्हां त्याची बायको त्याची दखलही घेत नाही. ती आपले काम चालू ठेवते. कोणालाच भावना नसतात का? त्याची मुलेही त्याच्या जवळ येत नाहीत. डॉ. देवाराम तिला सांगतो की, त्यांच्या समाजात एकत्र कुटुंब पद्धतीत मुले सर्वांचीच असतात. त्यालाही आपल्या मुलांना जवळ घेता येत नाही याचे वैशम्य वाटते. पण घरांतील वडिलधाऱ्या माणसांसमोर प्रेम व्यक्त करणे त्यांच्या संस्कृतीत बसत नाही. तरीही अशा चमत्कारिक व अनाकलनीय वातावरणात तिला परत यायचे असते. तिला राजस्थानी समाजाचे भाग व्हायचे असते. परकीय म्हणून राहायाचे नसते.

आणखी एक कारण म्हणजे तिचा ड्रायव्हर. तो अतिशय अबोल व लाजरा असतो. त्याच्या नावाखेरीज तिला काहीच माहीत नसते. पण त्याची गाडी म्हणजे तिचे आश्रयस्थान असते. तो तिचा आधार असतो. तो तिच्या संरक्षणार्थ नेहमी हजर होतो. गाडीमध्ये फक्त ते दोघे असल्याशिवाय तो थेट तिच्याशी कधीच बोलत नसे. जेव्हा ते गाडीतून बाहेर पडायचे तेव्हा तो जवळ येण्याचे टाळत असे. जणू त्याला तिच्या सोबत दिसण्याची लाज वाटे. ते चहासाठी ढाब्यावर थांबले तर साहजिकच ती बसण्यासाठी त्याच्या शेजारी असलेली खुर्ची निवडत असे. पण तो उठून दुसऱ्या ठिकाणी खुर्चीवर बसत असे जेणेकरून त्यांच्यामध्ये थोडे अंतर

(पृष्ठ क्र. ३० वर)

# मनसर

*जगात आजवर अनेक उत्खनने झाली. परंतु रामटेकजवळच्या मनसर येथील उत्खनन खास आहे. या उत्खननातून सोळाशे वर्षांपूर्वीचा अख्खा राजवाडाच पुरातत्त्वखात्याने उघडकीस आणला आहे. हा राजवाडा परिसर जगातले आठवे आश्चर्य ठरावे, या तोडीचा आहे. त्याचाच तपशील या लेखात दिलेला आहे. – संपादक*



**उत्खननात सापडलेला सोळाशे वर्षांपूर्वीचा राजवाडा**

'मनसर'...! नागपूर – जबलपूर रस्ते मार्गावरच नागपूरपासून ४२ कि. मी. अंतरावरचं लहानसं खेडेवजा गाव! आपल्याच तंद्रीत वावरणारं...! मात्र, आता या गावानं मरगळ झटकली आहे. नव्या जोशानं आणि चैतन्यानं ते सळसळतं आहे. हे साध्य झालं ते १९९२ साली इथं झालेल्या उत्खननामुळे आणि त्यातून सापडलेल्या वैभवामुळे!

सध्या हे स्थान 'रामधाम' आणि मँगनीजच्या खाणींसाठी ज्ञात असले तरी त्याला प्राचीन धार्मिक आणि राजकीय अधिष्ठानही लाभलेलं आहे. उदा. महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्री. चक्रधर स्वामींनी या स्थळाला भेट दिल्याचा उल्लेख महानुभावांच्या स्थान – पोथीत उपलब्ध आहे. त्यात या गावाचा 'मणशीळ' असा उल्लेख आहे. हे स्थळ आजही महानुभाव पंथीयांचे एक प्रमुख तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते. पण त्याही आधी म्हणजे आजपासून सुमारे सोळाशे वर्षांपूर्वी या गावाने 'वाकाटकांच्या राजधानीचं नगर' म्हणूनही लौकिक कमावलेला आहे. तेंव्हाच्या राजवटीनं हिडींबा टेकडीच्या पायथ्याशी तयार केलेलं, स्वच्छ पाण्याने तुडूंब भरलेलं आणि कमळाच्या फुलांनी रसरसलेलं सरोवर आजही आपले स्वागत करीत असल्याचे दिसते.

या सरोवराचा उल्लेख बाराशे वर्षांपूर्वी जवळच्या रामटेक येथील गडमंदिरात असलेल्या लक्ष्मणाच्या देवळातील यादवकालीन शिलालेखात 'मनिकाल कुंड तीर्थ' असा येतो. 'मनिकाल कुंडात स्नान करून हिडींबेची पूजा करावी' असे या शिलालेखात सांगितले आहे. याबाबत स्थानिकांच्या मनात महाभारतातील पांच पांडवांपैकी एक बलभिमाची पत्नी हिडींबेचा वास या क्षेत्रात असल्याची श्रद्धा आहे. एका आख्यायिकेनुसार सरोवराच्या काठावर धार्मिक कार्यात प्रसादासाठी लागणाऱ्या भांड्यांसाठी पूजा करून प्रार्थना केली असता ती सरोवरातून बाहेर यायची आणि कार्यक्रमाची सांगता झाल्यावर ती परत सरोवरात लुप्त व्हायची. हे कथानक खरे वा खोटे या भानगडीत आपण पडलो नाही तरी, संदर्भ तसाच काठही तोच ! पण, आता त्या काठावर त्या भांड्यांचा जिथे उपयोग व्हायचा, त्या भूमीवर आज देवळे, राजवाडे उभी आहेत परत कधीच त्या सरोवरात लुप्त न होण्यासाठी.!

लहानपणी मनसरच्या पलीकडील रामटेक इथे माझं आजोळ असल्याने तिथे माझे नेहमीच वास्तव्य असायचे. तेव्हा जाता-येता मनसेच्या हिडींबा टेकडीच्या उतारावर लहानसं देऊळ दिसायचं. ते देऊळ कशाचे,

कोणाचे, कुणी बांधले ? असे नानाविध प्रश्न मनात यायचे. काही वर्षांनंतर याच मंदिराच्या परिसरात असलेल्या शिळेवर आडव्या – उभ्या रेषांच्या जाळ्यांनी विणलेल्या आकृत्या काही संदर्भ सांगत असल्याचे समजले. त्या आकृत्यांचा विद्वानांनी अभ्यास केल्यानंतर तो 'शंख' लिपीतील मजकूर असल्याचे स्पष्ट झाले. हा मजकूर शासनाने गुलदस्त्यात ठेवला आणि हे क्षेत्र प्रतिबंधित म्हणून घोषित करीत रखवालदाराची नेमणूक केली. यामुळे माझी हिडींबा टेकडीविषयीची उत्सुकता वाढतच गेली. अशातच १९७२ साली या परिसरात एक शिवप्रतिमा प्राप्त झाली. ती बटूक भैरवाची उत्कृष्ट देवप्रतिमा असून शिवाच्या रौद्र – सौम्य स्वरूपातील असल्याचे कळले. सध्या ही प्रतिमा दिल्लीतील राष्ट्रीय संग्रहालयात दर्शनी भागात विराजमान आहे. राजेशाही ललितासनात बसलेली ही ठेंगू आणि गुबगुबीत मूर्ती म्हणजे वाकाटककालीन शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना असल्याचे सिद्ध झाले आहे. असो. या सगळ्या वार्ता मनसरविषयीच्या उत्सुकता वृद्धिंगत करण्याऱ्याच होत्या.



**बटूक भैरवाची मूर्ती**

पुढे हिडींबा टेकडीचे रितसर उत्खनन शासनाद्वारे ज्येष्ठ पुरातत्त्वज्ञ श्री.पी.एन.जोशी आणि श्री.ए.के.शर्मा ह्यांच्या मार्गदर्शनाखाली सन १९९२ ते १९९५ पर्यंत करण्यात आले. त्या काळात माझे वास्तव्य कामठी कोलमाइन्सला असल्याने, फावल्या वेळेत उत्खननाच्या स्थानी उत्सुकतेपोटी जात असे. तेव्हा श्री. ए. के. शर्मा यांची भेट व्हायची. सुरुवातीस एका मोठ्या देवकुलाचे अवशेष प्राप्त झाले. त्याला उत्खननकर्त्यांनी 'प्रवरेश्वर देवस्थानकुलम' असे नांव दिले. हे देवस्थानकुलम एका भल्यामोठ्या दीपस्तंभासारखे असून त्यात कोरलेल्या अनेक कोनाड्यांत शिवपिंडी ठेवलेल्या आढळतात. सर्वांत वर यज्ञकुंड असून, त्या काळी बळी देण्याची प्रथा होती, हेही स्पष्ट दिसते. इथल्या किन्नर प्रतिमेचे साम्य अजिंठा शिल्पातील किन्नर प्रतिमेशी जुळते आहे.

'देवस्थानकुलम'च्या उत्खननानंतर, उत्खननकर्त्यांनी आजपासून सुमारे सोळाशे वर्षांपूर्वी बांधलेला एक उत्तुंग राजप्रासाद प्रकाशात आणला. त्यांच्या मते वाकाटक राजा प्रवरेश्वर द्वितीय याने इ.स.४३५ च्या सुमारास या भव्यदिव्य राजप्रासादाची निर्मिती केली होती. हा राजवाडा परिसर स्वतःतच एक इतिहास सामावून आहे. राजवाड्यात असलेले सिंहासन 'बाहुबली' सिनेमात राणी बसलेली दिसते, अगदी तसेच आहे. जिथे राजसभा भरायची, ते जरा उंचावर असून तिथपर्यंत जाण्यासाठी विशाल रस्ता, त्यात अधूनमधून पायऱ्या, दोन्ही बाजूंनी बगीचे आणि सोबतीला थुईथुई नाचणारी कारंजी, त्यासाठी लागणारे पाणी पुरवठा करणारे दगडी पाईप, निरुपयोगी पाणी परत जाण्यासाठी नाल्या, पिण्याचे पाणी साठविण्यासाठी जमीन खोदून त्यात ठेवलेले रांजण, सरोवरातील पाण्यापर्यंत पोहोचण्यासाठी बांधलेले घाट, भूकंपाने वाकलेल्या भिंती आणि परिसराला बंदिस्त केलेला गडकोट हे प्रत्यक्षात आज आपण बघू शकतो.

असो. हे बांधकाम पूर्ण होताच प्रवरेश्वर द्वितीयने आपली राजधानी नंदिवर्धन (नगरधन) येथून प्रवरपूरला म्हणजे आजच्या मनसरला स्थलांतरित केली. प्राचीन अभिलेखात नमूद केलेले 'देवस्थानकुलम प्रवरपूर' हे स्थान म्हणजे सध्याचे मनसर असावे, असे बरेच पुरातत्त्वज्ञ मानतात.

पुढे वाकाटकांच्या अवनतीचा काळ सुरू झाला. इ.स. ५६३ च्या सुमारास दक्षिण कोसलातील (आजचं छत्तीसगढ) नलवंशी राजा भवदत्तवर्मन याने वाकाटक साम्राज्यावर स्वारी करून त्यांची राजधानी उद्ध्वस्त केली आणि उत्तुंग राजप्रासादही जाळला. (या जाळपोळीत तयार झालेले लाकडी कोळसे श्री. ए.के. शर्मांनी मला दाखवले होते आणि कित्येक दिवस ते माझ्या संग्रही होते.) याच राजप्रासादाच्या अवशेषावर पुढे सहाव्या शतकाच्या उत्तरार्धात एका भव्य स्तुपाची निर्मिती करण्यात आली. उत्खनन करताना स्तुपाची वेदिका आणि अंडाच्या भागाचे पुरावे निदर्शनास आलेत. याच काळात नंतर प्रसिद्ध आचार्य श्री. नागार्जूनांनी या परिसरात भारतातील निरनिराळ्या भागांतून औषधी वनस्पती आणून त्यांची लागवड केली आणि शास्त्रीय पद्धतीने जोपासना केली.

सध्याच्या रामटेक - मनसर या रस्ता मार्गांवर त्यांनी विविध प्रकारच्या तुळशींची लागवड केली होती. (विशेष म्हणजे या तुळशीची बने आतापर्यंत दिसायची. मागच्या दहा वर्षांपूर्वी या तुळशीवाटिका रस्ते रुंदीकरणात नष्ट झाल्यात.) पुढे श्री. नागार्जुन हे नालंदा विद्यापीठाचे कुलगुरू झाले. इ.स..६४१ साली त्यांनी शिष्योत्तम श्री. ह्यू.ऐन. त्संग यांच्या साथीने रामटेक, गडचिरोली जिल्ह्यातील प्राचीन मार्कंडेय मंदिर आणि चंद्रपूर जिल्ह्यातील माणिकगढ इत्यादी ठिकाणी भेटी दिल्याचा उल्लेख आढळतो. (माणिकगडच्या किल्ल्यात नागार्जुनांची रासायनिक प्रयोगशाळा होती.)

असो हिडींबा टेकडी व वाकाटकांच्या राजप्रासादादरम्यान अनेक प्राचीन वस्तूंचे अवशेष विखुरलेले आहेत.त्यात तारकाकृती मंदिराचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल. या मंदिराच्या केवळ अधिष्ठानाचा भाग शिल्लक असून तो पंचकोनी ताऱ्याप्रमाणे आहे. त्यात शिवलिंगाची स्थापना केली आहे. प्रभावती गुप्ताच्या प्रभावापूर्वी वाकाटक वंश बहुधा शैव मतावलंबी होता. वाकाटक साम्राज्यातील ही सर्व मंदिरे त्याचीच उदाहरणे आहेत.

हे सगळं पाहता- पाहता आणि अनुभवता - अनुभवता आपण त्या सुमारे सोळाशे वर्षांपूर्वीच्या युगात कसे समरस होत जातो, ते कळतच नाही. उशाशी भलामोठा डोंगर, सभोवताल मनमोहक हिरवाई, पोटात कमळाच्या फुलांचा गालिचा, त्यात राजप्रासादाचे आणि देवस्थानकुलमचे प्रतिबिंबित झालेलं पाणी अशा अवस्थेत मनसरचं सरोवर त्याच्या सौंदर्याची अदा आजही कायम ठेवून आहे. ते प्रत्यक्षात अनुभवणं.. म्हणजे स्वर्गीय आनंद मिळवून देणारं आहे.

सकाळच्या थोड्या सावल्या वर सरकून दिवस मध्यावर आला की, सूर्य आपल्या तेजासह सरोवराच्या पाण्यात प्रतिबिंबित होतो आणि त्याचं ते तेज अनेक कवडशांनी आसमंत नक्षीवंत करतो. ती प्रकाशमय नक्षी आणि तिचं प्रतिबिंब हा एक समृद्ध, नि:शब्द अनुभव असतो !!

तसंच ,पाण्यात रात्री चंद्र आपलं प्रतिबिंब निश्चल होऊन पाहात राहिला की, हिडींबा सरोवर आत्मशोधाचा प्रत्यय देते. तेव्हा पाण्यावरून परावर्तित होऊन आलेलं चांदणं हे सरोवर गोंदून घेतं आणि आदिम सौंदर्यानुभव पूर्णपणे उपभोगते. अशावेळी खोल पाण्यातून प्रकाशाचे अनेक उमाळे आनंदाने वर येतात आणि प्रत्यक्षातलं

(पृष्ठ क्र. २६ वर)

# बांगलादेश : ग्रहण, देवशयन आणि सज्जन


*रवींद्रनाथ ठाकूर यांच्या परिप्रेक्षात बांगलादेशातील उलथापालथीचा परामर्श प्रस्तुत लेखात श्री प्रमोद बापट यांनी घेतला आहे. - संपादक*


जवळपास साठ तासांपासून एक भीषण नाट्य आपल्या पूर्व सीमेपलीकडे सुरू आहे. राजकीय उलथापालथीबरोबरच खूप मोठी चिंताजनक ससेहोलपट सुरू आहे. विशेषतः तिथे राहणाऱ्या हिंदू नागरिकांची. हत्या होताहेत, महिला आणि मुली अत्याचाराला बळी पडताहेत, घरादारांची राखरांगोळी होते आहे आणि त्यांच्या हजारो वर्षांच्या मायभूमीतील आपण सारे सगेसोयरे हताश अगतिकतेने ते सारे वाचत व ऐकत आहोत, पाहात आहोत.

ऑगस्ट महिना तसाही विभाजनाची ठसठसती वेदना जागी करीतच अवतरतो. खरं तर हा श्रावणकाळ... पण मानसीच्या हर्षाला प्रदीर्घ काळ एका ग्रहणाने ग्रासलं आहे. तेजस्वी भास्कराचा काही काळ तेजोभंग करणारी आकाशातील ग्रहणे आपण पाहिली आहेत. कधी एका बाजूने, तर कधी केवळ मध्यबिंब ग्रासून टाकणाऱ्या ग्रहणछाया सरसरत येतात आणि एक अभद्र सावट जाळं टाकल्यासारखं पृथ्वीवर पसरतं. कधीतरी पूर्ण बिंबही अस्तंगत झालेलं दिसतं आणि तेव्हा काजळछायेने आपलं भोवताल माखून जातं, कलंकित होतं. हे असं होतं.. प्रखर सूर्यच नव्हे, तर शीतल चंद्रही अशा ग्रहणग्रासाला बळी पडतो.

पण सूर्य-चंद्रांची ही खंडग्रास, कंकणाकार वा खग्रास ग्रहणे सीमित वेळेत पळ काढतात. पुन्हा सूर्य-चंद्रांची ती नभ-निरंजने पुनःश्च उजळतात.. स्वतःबरोबर अवघा आसमंत.

पण भारताला ग्रासून राहिलेलं विभाजनाचं ग्रहण मात्र आज सत्त्याहत्तर वर्षे उलटून गेल्यावरही तसेच पूर्व-पश्चिम सीमाक्षेत्रं काळवंडून टाकलेलं आपण पाहतो आहोत, सोसतो आहोत. पुन्हा हताश अगतिकतेने. दुर्दैवाने तेव्हा आणि आत्ताही अनेकांना ह्या आपत्तीचं भान नाही. तेव्हा अधीर उताविळीने शीर्षस्थ नेतृत्वाने त्यांच्यावर पूर्णतः विसंबून त्यांच्या मागे येणाऱ्या समाजाला खोटी वचने देऊन, आशा जागवून अंधारात ठेवलं आणि अचानक जेमतेम दोन महिने आधी निर्लज्जपणे विभाजनाचं समर्थन केलं.






अक्षरशः हजारो घरं लुटली

गेली, विध्वंसाचं थैमान घातलं गेलं. मायभगिनींवर अत्याचारांचे पहाड कोसळले. संघ आणि आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांच्या शर्थीच्या प्रयत्नांमुळे... खरं तर पराक्रमामुळेच जीव मुठीत धरून नेसत्या वस्त्रानिशी काहीच जण भारतात परतू शकले. तेव्हा सत्तातूर राष्ट्रभक्त नूतन सत्ता उपभोगाच्या स्वप्नात दंग होते, भाबडे समाजवादी राखेतून आशास्वप्ने फुलवित होते; तर लाललांडगे आता दोन नव्या भूखंडात अराजकाच्या आगळीकी करायला मोकळे झाले.

सोमवारपासून बांगलादेशात उसळलेल्या होरपळीच्या मागे तो सत्त्याहत्तर वर्षांपूर्वीचा विभाजनाचा विखारवन्ही आहे हे आता तरी समजून घ्यायला हवं. पूर्व-पश्चिमेतील त्या दोन्ही विभाजित भारतभूमीला स्वातंत्र्याची अमृतफळे चाखायला मिळालीच नाहीत. कारण ती भूमी अजूनही ग्रहणग्रासाच्या अभद्र छायेत आहे.

'आपत्ती शिकवित जाते' असं म्हटलं जातं. इतिहासात तशी उदाहरणंही आहेत. पण देशाच्या विभाजनाला सात दशकांहून अधिक काळ लोटूनही आम्ही जागे झालेलो नाही. जसे जागे न झालेले इथे आहेत, त्यांच्याहून घातक जागं होणं नाकारणारे आहेत. ते जागे व्हायला तयारच नसतात ! उलटपक्षी ती भ्रांतीची ग्लानी त्यांना प्रिय असते. त्या ग्लानीला अमाप पैशांचा



छुन्नक छुन्नक नाद देणारी आमिषे असतात. प्रलोभनं असतात. अशा ग्लानियांचे जॉर्ज सोरोस सारखे पोशिंदे असतात. लाललांडग्याकडून शिक्षित मवाळांना संस्कृतीप्रेमाचे मायावी मुखवटे मिळालेले असतात, तर झुंडखोरांना भेदाची रणे माजविण्यासाठी विद्रोहाचे विस्तव मिळालेले असतात.

त्यामुळे आज मातृभूमीपासून तुटलेले, दुरावलेले पुन्हा एकसंध होण्याच्या पराकाष्ठांना स्वतंत्र मायभूतील माजलेली अशी शत्रूतणे आधी खुडून काढावी लागतील. ते निखळ सज्जनांचं काम नाही. कारण ते सद्गुण विकृतीने बाधीत असतात. गुरुदेव रवींद्रनाथ ठाकुरांना ह्या समस्येचं पुरतं आकलन झालेलं दिसून येतं. म्हणूनच आपल्या देशातील तत्कालीन हितशत्रूंकडून होत असलेल्या विविध आक्रमणांची मांडणी करून त्यावर मात करण्यासाठी हिंदूंनी काय करायला हवं, कसं करायला हवं हे सांगताना आपल्या मनातील दानवांनाही काम द्यायला हवं, त्यासाठी त्यांना जागं ठेवायला हवं असं ते नोंदवतात. ते वाचून स्तिमित व्हायला होतं. उदाहरण म्हणून पुढील अवतरण अवश्य वाचावं असं आहे.

''मुसलमानांच्या इतिहासात प्रवृत्तीच्या उद्दामपणा पुढे अधिकार, स्वार्थ. सिंहासन प्राप्तीसाठी नैसर्गिक स्नेह, दया, धर्म सारे कसे तुच्छ ठरले ते पाहिले, विद्रोह विश्वासघात प्रतारणा रक्तपात आणि सांगता न येण्याजोगी अनैसर्गिक निर्ममता पाहिली. ख्रिस्ती इतिहासातही हेच पाहिलं. हे पाहिले म्हणजे वाटते की, श्रेयाचा मार्ग तरी कोणीकडे आहे? जी शक्ती पशुत्वाला उत्तेजित करते तीच वेळेनुसार देवपण जागे करीत असते. प्रवृत्ती आणि निवृत्तीत प्रचंड संघर्ष आढळतो तेथेच देवांच्या नैवेद्याला विशुद्ध आध्यात्मिक अमृत घुसळून निघते. हे सारे माहीत असले तरी लोभ-हिंसेचे भीषण आंदोलन आणि विलास-लालसेची चंचलता यांची उदाहरणे पाहिली म्हणजे क्षणभर मन द्विधा अवस्थेत जाते. पाप-पुण्य

बऱ्या वाईटांची उत्तुंग तरंगीत असमानता बरी की आपोआप निर्मळ निर्जीव अशी मोठी समतळ निश्चलता श्रेयस्कर असा संदेह मनात उत्पन्न होतो. पैकी शेवटच्या भागाकडेच आमच्या अंत:करणाची ओढ आहे. सर्व प्रकारच्या उपद्रवकारक अनंत प्रयत्नांना आळा घालून संपूर्ण शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणारे आम्ही आहोत. परंतु शास्त्रे ही किल्ल्याप्रमाणे भारताचे संरक्षण करू शकत नाहीत. परकीयांचे आघात अनिवार्य असतात. लोभापासून स्वार्थसंरक्षण करणे आणि हिंसेपासून आत्मसंरक्षण करणे ज्या अर्थी आम्हाला भाग आहे त्याअर्थी मानवात जो दानव आहे त्याला काही नाही तर निदान सकाळ संध्याकाळ आम्हीच खायला घालून दाराबाहेर पहारे करण्यासाठी बसवून ठेवणं योग्य होईल. त्यामुळे आणखी काही फायदा झाला नाही तरी बलवानांच्या मनात आमच्याविषयी श्रद्धा उत्पन्न होईल.''

(वरील मूळ लेखन बांगला भाषेतून केलेलं असून ते १८९८ वर्षी 'भारती' मासिकाच्या श्रावण महिन्याच्या अंकातील 'भारतातील मुसलमान राजवटींचे इतिवृत्त' ह्या लेखातून प्रकाशित झालं होतं. त्या लेखाचं मराठी भाषांतर सरोजिनी कमतनूरकर ह्यांनी केलं असून तो संपूर्ण लेख 'इतिहास' ह्या गुरुदेव रवींद्रनाथांच्या इतिहासविषयक लेखांच्या प्रेस्टिज प्रकाशनाने १९७१ मध्ये प्रकाशित केलेल्या पुस्तकात समाविष्ट आहे. पृष्ठ १११-११२.)

देवशयनी एकादशीनंतरच्या सांप्रत चातुर्मास काळात देवांना सुखनिद्रा देण्याचं पुण्यकर्म सज्जनांनाच करायचं आहे. ते करीत असताना देशशत्रू दानवांवर मात करण्यासाठी त्या दानवी वाटांवर दक्ष पहारा ठेवून देवांचं कार्य यशस्वी करण्याइतकी जाग सज्जनांना येणार ना ?

**– प्रमोद वसंत बापट**

•••

(पृष्ठ क्र.२३ वरून – **मनसर**)

स्थापत्य आणि प्रतिबिंबाचे आभास या स्वप्न – वास्तवाच्या खेळात हे सरोवर आपल्याला सहज सामावून घेतं. अशावेळी तुम्ही समाधीवस्थेत जाता आणि त्या तंद्रीत दिसते ते राजाराणीचा नौकेत बसून रात्रीच्या चांदण्यात केलेला नौकाविहार आणि ऐकू येतं ते त्यावेळच्या संस्कृत भाषेतील पण आत्ताच्या भाषेतील, 'आजा सनम मधूर चांदणीमें हम, तुम मिले तो विराने भी आ जाएगी बहार, झुमने ललेगा आसमान' ! या मधुर क्षणांचा आनंद घेताघेता थोड्याच वेळात तुमच्या समोर येईल तो तेव्हाचा रंगोत्सव आणि दिसेल त्या दिवशीचा राजा आणि प्रजा यांनी भेदभाव विसरून केलेला हास्यकल्लोळ..! तळहातावर घेतलेले नानाविध रंग एकमेकांना फासतांना आणि नंतर उधळलेल्या रंगांची ती बदलत जाणारी नक्षी बघत वातावरण कसं बेहोश होत असतांना नाचगाण्यात तल्लीन झालेले नागरिक..!

या स्वप्नांच्या खेळांना विराम लागतो तो पहाटेच्या वेळी झुंजूमुंजू होत असतांना होणाऱ्या पक्ष्यांच्या किलबिलाटाने आणि मनसरच्या नागरिकांच्या दैनंदिन रहाटीने..! आपले स्वप्न तुटते, भंगते, पण तो आभास तसाच आपल्याला चिकटून असतो आणि खुणावतो 'परत एकदा या स्थळी परत यायचं आहे बरं का', असा सज्जड दम देत!

**– दिलीप नारायण वंडलकर**

४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,
वर्धा रोड, नागपूर – ४४००२५
मो.नं.: ९८३४६३६६५५
इ–मेल– wandalkardilip@gmail.com

•••

# डीप स्टेटचं नवं प्यादं - सोनम वांगचुक...

*'संपूर्ण जग आपलंच' ह्या ईर्षेपोटी स्वत:सहित सर्व जगाला अस्वस्थ करून सोडायचं हे काही व्यक्तींचं स्वप्न ! अशांच्या 'कार्याविषयी' आणि त्यातील व्यक्तींविषयी एक परामर्ष... अशा एका सोनम वांगचुक बद्दल...– संपादक*

संपूर्ण जगावर आपलंच प्रभुत्व असलं पाहिजे या महत्त्वाकांक्षेने झपाटलेल्या काही निरंकुशतावादी शक्ती जगात कार्यरत आहेत. आपल्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी आपल्याला हवे ते भू-राजकीय बदल कधी उघड बळजबरी किंवा आक्रमणांद्वारे, तर कधी गुप्त कट-कारस्थानांद्वारे सातत्याने घडवून आणणे ही या निरंकुशतावादी शक्तींची कार्यशैली असते. या शक्ती म्हणजे अमेरिकेचे वर्चस्व जपणारी, अँग्लो-सॅक्सन डीप स्टेट ; संपूर्ण मानवी सभ्यता नष्ट करून तिच्या जागी आपल्या विचारांची वामपंथी व्यवस्था निर्माण करण्यासाठी कटिबद्ध असलेली सांस्कृतिक मार्क्सवादाची विचारधारा, जिचा वापर जगातील उदयोन्मुख महासत्ता असलेला चीन चलाखीने करून घेत असतो ; संपूर्ण जग ख्रिश्चन धर्माच्या प्रभावाखाली असावं यासाठी जंग जंग पाडणारं चर्च ; आणि संपूर्ण जगावर इस्लामचा झेंडा फडकविण्यासाठी आतूर असलेला जिहादी इस्लाम. या चारही शक्ती कधी एकमेकांच्या सहकार्याने, तर कधी एकमेकांच्या विरोधात आपला अजेंडा पुढे रेटत असतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय डिप्लोमसी ही अनेक पदर असलेली, गुंतागुंतीची प्रक्रिया असते, ज्यात कोण कोणाच्या बरोबर आणि कोण कोणाचा विरोधक हे वास्तव सतत बदलत राहतं आणि समजून घेण्यास अवघड असतं. पण काही बाबतीत मात्र त्यांचे अजेंडे असे जुळून येतात की ते एकदिलाने कामाला लागतात. बांगलादेशचं शेख हसीना सरकार उलथून टाकताना हे कसं घडलं, याविषयी मी काही दिवसांपूर्वी लिहिलं होतं. भारताचे तुकडे करणे हा असाच एक कार्यक्रम आहे, ज्यावर या सगळ्यांचं एकमत आहे.



चिनी तत्त्वज्ञ सुन झु याने दोन हजार वर्षांपूर्वीच असं सांगून ठेवलं आहे की 'युद्धभूमीवर समोरासमोर, शस्त्रास्त्रांनी युद्ध करणं ही जुनी पद्धत झाली. खरं युद्ध म्हणजे शत्रूच्या प्रदेशातील लोकांचाच वापर करून त्याला आतून पोखरून टाकत इतकं शक्तिहीन करायचं (Subversion) की तो स्वतःहूनच कोसळून पडेल.' वर उल्लेख केलेल्या सर्व निरंकुशतावादी शक्तींना या मार्गाची महती पटून त्यांनी त्याचा वापर सुरू केला आहे. त्यासाठी त्यांनी आपल्या जागतिक वर्चस्वाच्या उद्दिष्टांवर, सद्गुण संकेत (Virtue Signalling) करणारे आकर्षक मुखवटे चढवून त्यामागे आपल्या विध्वंसक कारवाया सुरू ठेवल्या आहेत. या तंत्राची महती सर्वप्रथम पटली ती ख्रिश्चन चर्चला. त्यामुळे त्यांनी आपल्या धर्मप्रसाराच्या उद्दिष्टावर दीनदुबळ्यांना शिक्षण, आरोग्य वगैरे सेवा देण्याचा मुखवटा चढवला. कम्युनिस्टांनी 'बंदुकीच्या नळीतून येणारी रक्तरंजित क्रांती' ही उघड भूमिका सोडून देऊन, संस्कृतीला बळ देणाऱ्या संस्थांना आतून वाळवीसारखं पोखरून टाकणारी

सांस्कृतिक मार्क्सवादाची संकल्पना आपलीशी केली.

अमेरिकेचा स्वार्थ जपणाऱ्या 'डीप स्टेट'ला या तंत्राचं महत्त्व थोडं उशीराने समजलं.पण त्यानंतर मात्र त्यांनी अत्यंत प्रभावीपणे त्याचा वापर सुरू केला. आधी सीआयए या सर्वशक्तिमान गुप्तहेर संघटनेमार्फत जगात आपल्याला हवी तशी उलथापालथ घडवून आणण्याचा खेळ खेळला जात असे. पण या भूमीगत पद्धतीने, गुप्तपणे, प्रसंगी हिंसेचा वापर करून केल्या जाणाऱ्या कारवायांमुळे, 'उदारमतवादी लोकशाहीचे प्रणेते' या अमेरिकेच्या प्रतिमेवर ओरखडे पडत असत. हे लक्षात घेऊन अमेरिकेने 'नॅशनल एंडोमेंट फॉर डेमॉक्रसी' (NEP) ही, अमेरिकन सरकार व सीआयएची संपूर्ण शक्ती पाठीशी उभी असलेली, पण उघडपणे खाजगी मानली जाणारी संस्था उभी केली. 'संपूर्ण जगात लोकशाहीचा पुरस्कार करणे' या आकर्षक मुखवट्यामागे विविध देशांतली आपल्या नजरेत खुपणारी सरकारं उलथून टाकणे हे या संस्थेचे प्रमुख कार्य असते. यासाठी ते आपले लक्ष्य असलेल्या देशांत शिक्षण, पर्यावरण, लोकशाहीची स्थापना यासारखे आकर्षक मुद्दे घेऊन त्याआधारे सरकारविरुद्ध जनमत तयार करणे, चळवळी उभ्या करणे, समाजात फूट पाडून संघर्ष भडकवणे, अराजकाची परिस्थिती निर्माण करून सरकार उलथून टाकणे अशा पद्धतीने कार्य करतात. त्या देशात आधीपासूनच लोकशाही अस्तित्वात असेल तर देशातील लोकशाही कमजोर झाल्याची आवई उठवली जाते. या योजना राबविण्यासाठी त्यांनी प्रचंड आर्थिक शक्ती असलेली फाऊंडेशन्स, मीडिया, क्टिव्हिस्ट्स, एनजीओज् यांचं एक प्रचंड विश्वव्यापी जाळं उभं केलं आहे. त्यांनी उभ्या केलेल्या आंदोलनांमागे याच जाळ्याची आर्थिक शक्ती आणि प्रचारतंत्रावरील हुकूमत उभी असलेली हमखास आढळते. डीप स्टेटच्या योजनेनुसार भारतातील निवडणुकांमध्ये सरकार बदलण्यात यश आलं नाही म्हटल्यावर योगेंद्र यादव यांनी काढलेले, 'यापुढे संविधानाचं रक्षण निवडणुकांमुळे नव्हे तर जनआंदोलनांमधून होईल' हे उद्‌गार पुढे काय वाढून ठेवलं आहे, याचेच द्योतक आहेत. इजिप्त, ट्युनीशिया यासारख्या देशांमध्ये २०११ साली झालेली 'अरब स्प्रिंग' ही चळवळ, युक्रेनमध्ये २००४ मध्ये झालेली 'ऑरेंज रिव्हॉल्युशन' चळवळ तर २०१३-१४ मधील 'युरोमेडन प्रोटेस्ट्स', २०२४ मधील बांगलादेशातला सत्तापालट अशा अनेक प्रयोगांमधील अनुभवातून, नको असलेली सरकारे उलथवून टाकणारे 'रेजीम चेंज एक्स्पर्टस्' (सरकारे उलथवून टाकणारे तज्ज्ञ) तयार झाले आहेत. अशाच एक 'एक्स्पर्ट' व्हिक्टोरिया न्यूलँडस्' यांची नुकतीच NEP च्या संचालक म्हणून नेमणूक झाली. पूर्वी जे काम सीआयए गुप्तपणे करत असे, तेच काम आता NEP उघडपणे, Self righteous पणाचा आव आणून करते. अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता देशहिताची धोरणे आखणारी सरकारे कशी 'लोकशाहीविरोधी' आहेत आणि त्यांना उलथून टाकणे हे कसे पवित्र कार्य आहे असा प्रचार टिपेला नेऊन त्यांची इकोसिस्टिम या कार्यात महत्त्वाचा हातभार लावते. या चळवळींमधून आजवर विविध देशांत लोकशाही नव्हे, तर अराजक, हिंसा आणि विध्वंस यांचं थैमानच निर्माण झालं आहे.

सामाजिक न्याय, लोकशाही, पर्यावरण अशा आकर्षक मुखवट्यांबरोबरच, आपल्या विध्वंसक कारवायांचा स्वीकारार्ह चेहरा ठरतील अशी काही आकर्षक व्यक्तिमत्त्वेही ते उभी करतात. विविध मानसन्मान, पुरस्कार देऊन एक 'आयकॉन' म्हणून त्यांची उभारणी केली जाते. 'मॅगसायसे पुरस्कार' या मंडळींना हमखास मिळतो. अनेकदा 'नोबेल पुरस्कारा'साठीही वर्णी लागते! बांगलादेशवर लादल्या गेलेल्या, कुठलीही ऑथेंटिसिटी किंवा संविधानिक आधार नसलेल्या

सरकारचे 'सल्लागार' महंमद युनुस हा असाच एक डीप स्टेटने जोपासलेला चेहरा. भारतातही असे अनेक चेहरे निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. त्यातला एक चेहरा म्हणजे अरविंद केजरीवाल. आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी केजरीवाल कितपत उपयुक्त ठरतील याची खात्री उरलेली नसल्यामुळे नव्या चेहऱ्यांचा शोध सुरू झाला आहे. यातलंच एक नाव म्हणजे सोनम वांगचुक.

आमिर खानच्या 'थ्री इडियट्स' मधील रँचो हे पात्र सोनम वांगचुकवरून घेण्यात आलं आहे असं सांगण्यात आलं आणि त्याच्याभोवती सद्गुणांचं एक वलय निर्माण करण्यात आलं. चित्रपटात रँचो हा एका गरीब माळ्याचा मुलगा दाखविण्यात आला आहे. पण सोनम एका उच्चभ्रू, श्रीमंत आणि सत्ताधीश कुटुंबात जन्मला हे मात्र सांगितलं गेलं नाही. त्याचे वडील सोनम वांग्याल हे कॉंग्रेस नेते आणि जम्मू काश्मीर सरकारमध्ये मंत्री होते. २००८ साली कॉंग्रेस पक्षाने चीनच्या कम्युनिस्ट पक्षाशी गुप्त समझोता केला, ज्याचा तपशील अजूनही उघड करण्यात आलेला नाही. त्यानंतर आमीर खानच्या चित्रपटांना चीनमध्ये अचानक हजारो कोटी रुपयांची रहस्यमय कमाई होऊ लागली. २००९ साली कॉंग्रेस सरकारचे संरक्षणमंत्री ए. के. अँटनी यांनी लोकसभेत सांगितले की, 'आपण बांधलेले पूल आणि रस्ते यांचा वापर करून चीनने, आपल्यावरच आक्रमण करू नये म्हणून आम्ही भारत-चीन सीमेवर कुठल्याही पायाभूत सुविधा निर्माणच करत नाही.' सोनम वांगचुक यांनी अशी मागणी केली आहे की लडाखच्या पर्यावरणावर परिणाम होऊ नये म्हणून मोदी सरकारने सीमेवरील पायाभूत सुविधांची उभारणी थांबवावी. संपूर्ण लडाख गिळंकृत करण्याची चीनची उघड महत्त्वाकांक्षा असताना भारतीय सैन्याला वेगवान हालचाली करता याव्यात यासाठी भारत सरकार करत असलेल्या प्रयत्नांना खीळ घालण्याचा हा प्रकार आहे, जो कॉंग्रेस आणि सोनम वांगचुक दोघांनाही मान्य आहे... आणि अजून बरेच डॉट्स जोडायचे बाकी आहेत !

१९८८ साली वांगचुक याने लडाखमध्ये 'स्टुडंट्स एज्युकेशनल अँड कल्चरल मुव्हमेंट' तर १९९५ मध्ये 'ऑपरेशन न्यू होप' ची सुरुवात केली. त्याच्या सर्व प्रकल्पांना 'फोर्ड फाऊंडेशन' व 'डॅन चर्च एड' यांच्याकडून अर्थसहाय्य मिळत असे. १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला त्याने अमेरिकन रिबेका नॉर्मन हिच्याशी विवाह केला. तिचे शिक्षण अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाशी निकटचा संबंध असलेल्या 'स्कूल फॉर इंटरनॅशनल ट्रेनिंग (SIT)' व हार्वर्ड विद्यापीठात झाले होते. SIT ला फोर्ड फाऊंडेशन व जॉर्ज सोरोसच्या 'ओपन सोसायटी फाऊंडेशन'कडून अर्थसहाय्य मिळत असे. रिबेकाशी लग्न झाल्यानंतर वांगचुकला परदेशातून मोठ्या प्रमाणात पैसा मिळू लागला. २००२ साली त्याला 'अशोका फेलोशिप' मिळाली जी स्कोल फाऊंडेशन, श्वॅब फाऊंडेशन व रॉकफेलर फाऊंडेशन यांच्या वतीने दिली जात होती. २००४ साली युपीए सरकार आल्यानंतर वांगचुकला मोठ्या प्रमाणात नवीन संधी व सहाय्य मिळू लागलं. लडाखचे व्हिजन डॉक्युमेंट बनविण्याच्या कमिटीवर, तसेच लडाखचे शिक्षण आणि पर्यटन धोरण तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समित्यांवर त्याची नेमणूक करण्यात आली. मनमोहनसिंग सरकारच्या एचआरडी मंत्रालयाच्या 'नॅशनल गव्हर्निंग कौन्सिल फॉर एलिमेंटरी एज्युकेशन'वरही त्याची नियुक्ती झाली. २००७ ते २०१० पर्यंत डेन्मार्कची एनजीओ Mellemfolkeligt Samvirk, भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयासाठी काम करत होती. सोनम वांगचुक हा त्यांचा सल्लागार होता. विविध हितसंबंधांच्या जाळ्यातून त्याची कॉंग्रेस पक्षाशी कमालीची जवळीक होती हे स्पष्ट आहे.

२०१६ साली त्याला स्वित्झर्लंड येथील 'इंटरनॅशनल युनियन फॉर कॉंझर्व्हेशन ऑफ नेचर' यांच्या

वतीने Fred M. Packard हा पुरस्कार देण्यात आला. याचे फंडिंग रॉकफेलर फाऊंडेशनकडून झाले होते. याच रॉकफेलर फाऊंडेशनची अशोका फेलोशिप त्याला मिळाली होती हे आपण वाचलेच आहे. २०१७ साली फोर्ड फाऊंडेशनकडून त्याला T. N. Koshoo Memorial Award देण्यात आले. २०१८ साली त्याला फोर्ड फाऊंडेशनचा सर्वोच्च 'मॅगसायसे पुरस्कार' देण्यात आला. दरवर्षी एक महत्त्वाचा पुरस्कार या गतीने त्याला आयकॉन बनवलं जात होतं. ज्या 'लीड इंडिया' या संस्थेशी तो संबंधित आहे तिचं फंडिंगही फोर्ड फाऊंडेशनकडूनच होतं. वांगचुकशी संबंधित असलेली आणखी एक संस्था 'इंटरनॅशनल असोसिएशन फॉर लडाख स्टडीज' यांनी लडाखच्या संस्कृतीवर चार खंड प्रकाशित केले. या प्रकल्पाचे फंडिंग कोणाकडून आले ? अर्थातच फोर्ड फाऊंडेशनकडून ! या सर्व माहितीवरून सोनम वांगचुकची काँग्रेस पक्ष व डीप स्टेटची अर्थशक्ती ज्यांच्या मार्फत वापरली जाते, ती फाऊंडेशन्स यांच्याशी किती जवळीक आहे हे स्पष्ट होते. आणि त्यांनी सोनमला एक आयकॉन म्हणून उभं करण्यासाठी किती गुंतवणूक केली आहे, हे देखील लपून राहत नाही. या गुंतवणुकीची परतफेड करण्याची वेळ आता आलेली दिसते. म्हणूनच कलम ३७० रद्द केल्यानंतर प्रथम त्याचे स्वागत करणाऱ्या सोनम वांगचुकने नंतर कोलांटी उडी मारून त्या निर्णयाला विरोध करायला सुरुवात केली. याचा फायदा घेऊन पाकिस्तानने या निर्णयाला लडाखचाही विरोध असल्याचा प्रचार सुरू केला. 'चीन आणि पाकिस्तानला फायद्याच्या ठरतील अशा चळवळी करण्याचे कसले कंपल्शन त्याच्यावर आहे ?' हा प्रश्न विचारणे गरजेचे आहे.

आता आपण 'एकविसाव्या शतकातले गांधी' असल्याचा आव आणून त्याने दिल्लीत उपोषण सुरू केले आहे ! त्याच्या आधारे भारतविरोधी प्रचार जगभर टिपेला नेला जाईल. बांगलादेश नंतर आता रेजीम चेंज साठी भारताचा नंबर लावण्याची डीप स्टेटची इच्छा लपून राहिलेली नाही. त्यामुळे पर्यावरण, लोकशाही, संविधान यासारख्या छान-छान विषयांसाठी आंदोलने करणारे अनेक आयकॉन्स आपल्याला बघावे लागणार आहेत. त्यांना वेळीच ओळखणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे !

**– अभिजित जोग**
ज्येष्ठ लेखक, पुणे

•••

---

(पृष्ठ क्र. २० वरून – **उंटांची अद्भूत रम्य दुनिया २०२४ हे आंतराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष**)

राहील. हे पाहून तिला वाईट वाटे, पण दुसरीकडे जेव्हा तिला त्याची गरज भासे तेव्हा तो हजर असे. जर ती कधी संकटात सापडली किंवा कोणीतरी तिला त्रास दिला, तर तो तिला संकटातून बाहेर काढण्यासाठी जादूने कोठूनही प्रकट होई. तिच्याप्रमाणे तो सुद्धा काय चालले आहे या बाहेरील सर्व गोष्टींचे निरीक्षण करत असल्याचे दिसत होते. तिला वाटते की, तो तिला पाहिजे तिथे तिच्याबरोबर जाईल व तिला माहीत होते की, ती त्याच्याबरोबर सुरक्षित होती. ही परिस्थिती तिला पुढे काम चालू ठेवण्यास एक महत्त्वाचे कारण होते.

दिल्लीतील तिचे शेवटचे काम होते की, पुष्करमधील प्रसिद्ध उंट बाजार पाहण्यासाठी ती नोव्हेंबरमध्ये तिच्या उर्वरित फेलोशिप महिन्यात परत येऊ शकेल का? हे विचारणे.

**– सौ. अल्पना बापट**
डॉ. बापट हॉस्पिटल, ठाणे
भ्रमणध्वनी : ९८३३०२९३५६

•••

---

# परिसर वार्ता

– संकलित

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

**आंतरराष्ट्रीय Spell Bee परीक्षेचा निकाल**

**स्तर पहिला – आंतरशालेय स्तर**

Spell Bee परीक्षेचा निकाल जाहीर करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. विद्यार्थ्यांनी आंतरशालेय स्तरावर उत्तम कामगिरी बजावली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

* १ जण उपलब्ध श्रेणीत आंतरशालेय टॉपर आहे.
* ६ जणांना अचिव्हमेंट इन डिस्टिंक्शनचे प्रमाणपत्र दिले जाईल.

**शाळेतील सर्वोत्तम गुण मिळवणारे विद्यार्थी :–**

| | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | कु. गोखले अन्वी अजय | ३री | १०० |



**इयत्तेतील सर्वोत्तम गुण मिळवणारे विद्यार्थी :–**

| | विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | कु. वर्तक प्रथमेश पुष्कराज | १ली | ८८ |
| २ | कु. पाष्टे मीरा प्रीतम | १ली | ८६ |
| ३ | कु. वीरकर स्वरांग निनाद | २री | ९० |
| ४ | कु. आंब्रे आद्यंत अविनाश | २री | ८८.५ |
| ५ | कु. धोंगडे स्पृहा योगेश | ४थी | ८३ |
| ६ | कु. चव्हाण अवनीश तुषार | ४थी | ७९ |

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमिक विभाग

शाळेच्या माननीय मुख्याध्यापिका डॉ. अस्मिता मोहिले यांना ९ ऑक्टोबर रोजी 'मनसे' तर्फे त्यांचा शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल प्रतिष्ठित 'नवदुर्गा पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.



## विद्या प्रसारक मंडळाचे<br>ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**दिनांक २७ सप्टेंबर २०२४ आणि ०३ ऑक्टोबर २०२४ – ठाणे म्युनिसिपल कौन्सिल विधी महाविद्यालयातील ओरिएन्टेशन कार्यक्रम**

**कार्यक्रमाचा उद्देश**

नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची शैक्षणिक संरचना, सुविधांचे महत्त्व, तसेच संपूर्ण अभ्यासक्रमाची माहिती देण्यासाठी २७ सप्टेंबर २०२४

आणि ०३ ऑक्टोबर २०२४ रोजी ठाणे म्युनिसिपल कौन्सिल विधी महाविद्यालयात ओरिएन्टेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अ, ब, आणि क तुकडीसाठी २७ सप्टेंबर २०२४ आणि ड व इ तुकडीसाठी ०३ ऑक्टोबर २०२४ रोजी कार्याक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**कार्यक्रमाची रचना व विविध मार्गदर्शन सत्रे :-**

कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र-गीताच्या गायनाने करण्यात आली. त्यानंतर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्यांनी विद्यार्थ्यांचे कॉलेजला प्रवेश मिळाल्याबद्दल अभिनंदन केले. तसेच कॉलेजवर विश्वास दाखवल्याबद्दल आभारही मानले. पुढे त्यांनी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयात स्वागत करताना त्यांना येथील शैक्षणिक वातावरण, शिस्त, आणि महाविद्यालयीन जीवनाची ओळख करून दिली.

**१. 'मेन्टॉर-मेंटी' मार्गदर्शन सत्र :**

सहाय्यक प्राध्यापक डॉ. रुपाली जामोदे यांनी 'मेन्टॉर-मेंटी' प्रणालीवर विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना या प्रणालीचा फायदा आणि त्यातून त्यांचा शैक्षणिक आणि वैयक्तिक विकास कसा साधता येईल, हे समजावून सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना मेंटर्सचा महत्त्वपूर्ण आधार मिळविण्यासाठी प्रेरित केले.

**२. 'अँटी-रॅगिंग' सत्र :**

सहाय्यक प्राध्यापक कृष्णा कामत यांनी रॅगिंग विरोधी विषयावर विद्यार्थ्यांना माहिती दिली. त्यांनी रॅगिंगचे कायदेशीर परिणाम, त्याचे शैक्षणिक वातावरणावर होणारे परिणाम, आणि रॅगिंगपासून बचावासाठी उपलब्ध असलेल्या तक्रार-व्यवस्थांबद्दल माहिती दिली.

**३. 'अंतर्गत परीक्षा आणि प्रॅक्टिकल ट्रेनिंग' विषयावर विशेष मार्गदर्शन :**

सहाय्यक प्राध्यापक श्री विनोद वाघ ह्यांनी 'अंतर्गत परीक्षा आणि प्रॅक्टिकल ट्रेनिंग' विषयावर विद्यार्थ्यांचे विशेष मार्गदर्शन केले. वर्षातून दोन वेळा विद्यार्थ्यांना सहामाही विद्यापीठाच्या परीक्षा द्याव्या लागतात. त्यापूर्वी अंतर्गत परीक्षा द्याव्या लागतात. त्याची संपूर्ण माहिती श्री विनोद वाघ ह्यांनी दिली.

**४. विषय ओळख आणि अभ्यासक्रमाचे मार्गदर्शन:**

कार्यक्रमात इतर सहाय्यक प्राध्यापकांनी आपल्या विषयांची ओळख करून दिली. विद्यार्थ्यांना अभ्यास-क्रमातील विविध विषयांची संक्षिप्त माहिती दिली, तसेच मूल्यांकन प्रणाली, अंतर्गत परीक्षा आणि प्रकल्पांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना विषयाची मूलभूत समज वाढवण्यासाठी अभ्यासाच्या पद्धतीही सुचविल्या.

**प्रवेश पुस्तिका आणि साहित्य वाटप :**

प्रत्येक विद्यार्थ्यास त्याच्या अंतर्गत परीक्षांसाठी मदत म्हणून 'प्रोजेक्ट बुक,' 'इंग्लिश विषयाची माहिती पुस्तिका,' आणि 'प्रॅक्टिकल ट्रेनिंग' बाबत माहिती पुस्तिकेचे वाटप करण्यात आले. या साहित्याच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण अभ्यास विषयांची पूर्वतयारी करण्यास व त्यांचे शैक्षणिक कार्य व्यवस्थित पार पाडण्यास मदत होईल.

**विद्यार्थ्यांचा प्रतिसाद :**

विद्यार्थ्यांनी ओरिएन्टेशन कार्यक्रमाला अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक व्यवस्थेविषयी समाधान व्यक्त केले आणि सर्व प्राध्यापकांचे आभार मानले. नव्या शैक्षणिक वाटचालीची ओळख मिळाल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला व ते महाविद्यालयीन जीवनाचा अनुभव घेण्यासाठी अधिक उत्सुक झाले.

**निष्कर्ष :**

ओरिएन्टेशन कार्यक्रमाने नव्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या शैक्षणिक व्यवस्थेशी जोडून घेतले

'अहंकार' हा माणसाच्या प्रगतीचा मोठा शत्रू आहे.

आणि त्यांचा शैक्षणिक प्रवास यशस्वी करण्यासाठी आवश्यक असणारी प्राथमिक माहिती दिली.

- **विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे म्युन्सिपल कौन्सिल लॉ कॉलेज – बार कौन्सिल ऑफ इंडिया चे निरीक्षण अहवाल**

तारीख : ०५ ऑक्टोबर २०२४

स्थळ : विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे म्युन्सिपल कौन्सिल लॉ कॉलेज

प्रभारी प्राचार्य : डॉ. श्रीविद्या जयकुमार

निरीक्षण पथकाचे सदस्य:

- प्रोफेसर शर्मिला घुगे, जितेंद्र चव्हाण लॉ कॉलेज, निरीक्षणाचे अध्यक्ष
- श्री उन्निक्रीशणन नाम्बिअर, मांजरा चॅरिटेबल ट्रस्टचे प्रभारी प्राचार्य शिक्षक प्रतिनिधी
- ॲड. श्रीकांत गावंड, वकील प्रतिनिधी

**निरीक्षणाची प्रक्रिया :**

निरीक्षण पथकाने महाविद्यालयात पोहोचल्यानंतर निरीक्षणाची जवाबदारी सोपवण्यात आलेले सहाय्यक प्राध्यापक श्री विनोद वाघ व सहाय्यक प्राध्यापक डॉ. रुपाली जामोदे ह्यांनी तात्काळ त्यांचे स्वागत केले आणि महाविद्यालयाच्या विविध विभागांचे तपशीलवार निरीक्षण करण्यात आले. निरीक्षणामध्ये खालील गोष्टींचा समावेश होता:

१. मूट कोर्ट : पथकाने मूट कोर्टची संरचना, विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक सत्रांची गुणवत्ता तपासली. मूट कोर्ट विद्यार्थ्यांना कायद्याच्या व्यवहारिक ज्ञानाची अनुभूती देण्यासाठी महत्त्वाचे आहे, त्यामुळे याचे बारकाईने निरीक्षण करण्यात आले.

२. क्लास रूम्स: इन्स्पेक्शन पथकाने प्रत्येक वर्गखोल्याची पाहणी करून त्यामधील आसनव्यवस्था, प्रकाश व्यवस्था, व्हेंटिलेशन आणि तंत्र-स्नेही साधनांची तपासणी केली.

३. परीक्षा कक्ष : परीक्षांच्या आयोजनाची प्रक्रिया आणि सुरक्षिततेची हमी देणारे उपाय तपासण्यात आले. निरीक्षकांनी परीक्षांच्या दस्तऐवजांची खातरजमा केली आणि परीक्षांच्या नियंत्रणाची प्रक्रिया व्यवस्थित असल्याचे नोंदवले.

४. स्टाफ रूम आणि अन्य सुविधा : इन्स्पेक्शन पथकाने स्टाफ रूम आणि इतर सहकाऱ्यांच्या क्षेत्रांची तपासणी केली. त्यांनी कार्यक्षमतेची व सांभाळावयाच्या सुविधा तपासल्या आणि एकूण वातावरणावर समाधान व्यक्त केले.

५. प्रशासकीय कागदपत्रे: महाविद्यालयाच्या कागदपत्रांचे मूल्यांकन करताना पथकाने शैक्षणिक नोंदी, उपस्थिती रजिस्टर, अभ्यासक्रम पत्रक, विविध शैक्षणिक व प्रशासकीय दस्तऐवज यांचे परीक्षण केले. सर्व कागदपत्रे व्यवस्थित व वेळोवेळी अद्यतनित असल्याचे दिसून आले.

**पथकाचे निरीक्षण आणि अभिप्राय :**

निरीक्षण पथकाने महाविद्यालयातील शिक्षणाची गुणवत्ता, विद्यार्थ्यांसाठी असलेल्या सुविधांची चांगली स्थिती, आणि महाविद्यालयाच्या कार्यक्षमतेचे कौतुक केले. त्यांनी महाविद्यालयाच्या शिस्तबद्ध कारभार आणि विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या अनुभवात्मक शिक्षणावर सकारात्मक प्रतिक्रिया दिली. डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या नेतृत्वाखालील व्यवस्थापनाने शिक्षणाच्या उच्च दर्जाची, तसेच प्रशासनातील कार्यक्षमतेची हमी दिल्याचे निरीक्षकांनी नमूद केले.

**शुभेच्छा आणि भविष्याच्या सूचना :**

निरीक्षण पथकाने महाविद्यालयाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करून भविष्यातील शैक्षणिक आणि प्रशासकीय विकासासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी महाविद्यालयाने यापुढेही विद्यार्थ्यांना उत्कृष्ट कायदे शिक्षण देण्यासाठी आपले योगदान सुरू ठेवावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

**निष्कर्ष :**

संपूर्ण निरीक्षणाच्या निष्कर्षात, पथकाने महाविद्यालयाच्या कामकाजाच्या गुणवत्ता आणि शिस्तबद्धतेबद्दल प्रशंसा केली. इन्स्पेक्शन फॉर्ममध्ये संपूर्ण माहिती भरून निरीक्षणाचे आवश्यक अहवाल तयार करण्यात आले.



- **व्हिपीएमच्या टीएमसी विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या महाराष्ट्र ज्युडीशियल अकॅडमी, उत्तन येथील भेट.**

भेटीची तारीख : ९ ऑक्टोबर २०२४

आयोजन : ह्या सहलीचे आयोजन अध्ययन सहल समितीने प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते.

एकूण सहभागी : ५४ विद्यार्थी आणि ३ प्राध्यापक

**परिचय :**

९ ऑक्टोबर २०२४ रोजी, व्हिपीएमच्या टीएमसी विधी महाविद्यालयाने महाराष्ट्र ज्युडीशियल अकॅडमी, उत्तन येथे एक ज्ञानवर्धक शैक्षणिक भेट आयोजित केली. या उपक्रमाचा उद्देश एलएलबीच्या शेवटच्या वर्षात शिकत असणाऱ्या ५४ विधी विद्यार्थ्यांना न्यायालयीन प्रणालीची माहिती देणे आणि कायदा क्षेत्रातील विविध करिअर संधींचा अभ्यास करणे होता. विद्यार्थ्यांसोबत तीन प्राध्यापक उपस्थित होते: डॉ. रुपाली जामोदे, श्रीमती कृष्णा कामत, आणि श्री. यतीन पंडित ह्यांच्या मार्गदर्शनाखाली या भेटीने विद्यार्थ्यांना कायद्यातील व्यावसायिक जीवनाबद्दल अधिक विचार करण्यास प्रोत्साहित केले.

**महाराष्ट्र ज्युडीशियल अकॅडमीकडे जाण्याचा प्रवास :**

दिवसाची सुरुवात विद्यार्थ्यांनी सकाळी ७:३० वाजता महाविद्यालयाच्या गेटवर एकत्र येऊन केली. ते उत्साहाने भरलेले होते. सर्व वातानुकूलित बसमध्ये बसले आणि उत्तनच्या दिशेने दोन तासांच्या प्रवासासाठी निघाले. बसमध्ये प्रवासाच्या अपेक्षा, न्यायालयीन क्षेत्राबद्दलची त्यांच्या आकांक्षा आणि जिज्ञासा याबद्दल चर्चा सुरू झाली. सकाळी ९:३० वाजता महाराष्ट्र ज्युडीशियल अकॅडमी ठिकाणी पोहोचताच विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावले गेले.

**कार्यक्रमाचे वेळापत्रक :**

**सकाळचे सत्र – (सकाळी ९:३० – १०:३०) ताजेतवाने होणे आणि नाश्ता.**

विद्यार्थ्यांनी ताजेतवाने होण्यासाठी थोडा वेळ घेतला आणि ज्युडीशियल अकॅडमीने प्रदान केलेला पौष्टिक नाश्ता घेतला. या नाश्त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि प्राध्यापकांमध्ये संवाद साधण्यात मदत झाली.

जेथे अहंकार आहे, तेथे स्नेह आणि प्रेम नाही.

**सकाळी १०:३० – ११:०० : नोंदणी**

नाश्त्यानंतर विद्यार्थ्यांनी कार्यक्रमासाठी नोंदणी प्रक्रिया केली. या प्रक्रियेत सहभागीता अधिकृतपणे नोंदवली गेली आणि विद्यार्थ्यांना आवश्यक सामग्री मिळाली.

**सकाळी ११:०० – ११:३० : ज्युडीशियल अकॅडमीच्या प्राध्यापकांशी संवाद**

विद्यार्थ्यांना ज्युडीशियल अकॅडमीच्या प्राध्यापक मंडळाची ओळख करून देण्यात आली. यामध्ये अकॅडमीची उद्दिष्टे आणि प्रशिक्षण कार्यक्रमांचे विवरण केले गेले.

**सकाळी ११:३० – ११:४० : ज्युडीशियल अकॅडमीच्या प्राध्यापकांचे सन्मान**

एक छोटा उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला. सहाय्यक प्राध्यापक यतीन पंडित यांनी ज्युडीशियल अकॅडमीच्या सर्व प्राध्यापकांचे स्वागत केले. डॉ. रुपाली जामोदे आणि श्रीमती कृष्णा कामत यांनी विविध प्राध्यापकांना सन्मानित केले.

**सन्मानित प्राध्यापक :**

- श्री. गिरीश आर. अग्रवाल, संयुक्त संचालक
- श्री. मकरंद देशपांडे, अतिरिक्त संचालक
- श्रीमती महेश्वरी पाटवारी, अतिरिक्त संचालक
- श्री. भूषण ठाकूर, उपसंचालक
- श्री. सागर साळवे, सहाय्यक संचालक

या सन्मानाने वकील शिक्षणाबद्दल आदर व्यक्त झाला आणि दिवसासाठी सकारात्मक वातावरण तयार झाले.

**मार्गदर्शन सत्र –**

**सकाळी ११:४० – १:३० : मार्गदर्शन सत्र श्री. भूषण ठाकूर**

श्री. भूषण ठाकूर यांनी 'न्यायालयीन क्षेत्रातील करिअर संधी' या विषयावर एक प्रेरणादायक सत्र दिले. न्यायाधीश, मजिस्ट्रेट, कायदेशीर सल्लागार, आणि कायदा संशोधन यामध्ये उपलब्ध असलेल्या विविध संधींचा त्यांनी थेट उल्लेख केला. या सत्रात विद्यार्थ्यांना अन्वेषण, संवाद कौशल्य, आणि नैतिक निर्णय क्षमतांचे महत्त्व सांगितले.

**दुपारी १:३०– १:४० : प्रश्नोत्तर सत्र**

या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना श्री. ठाकूर यांना प्रश्न विचारण्याची संधी मिळाली. त्यांनी न्यायालयीन पदांवर आवश्यक असलेल्या पात्रतेपासून ते कायदा व्यावसायिकांच्या समोर येणाऱ्या आव्हानांपर्यंत विविध विषयांवर चर्चा केली.

**दुपारी १:४०– २:०० : ज्युडीशियल अकॅडमीचा दौरा**

शिक्षणात्मक सत्रानंतर विद्यार्थ्यांना ज्युडीशियल अकॅडमीमधील सुविधांचा दौरा देण्यात आला. यामध्ये प्रशिक्षण कक्ष, ग्रंथालय, आणि अनुकरण न्यायालयांचा समावेश होता.

**दुपारचे जेवण आणि प्रस्थान**

**दुपारी २:०० – ३:०० दुपारचे जेवण**

अकॅडमीने विद्यार्थ्यांसाठी एक स्वादिष्ट जेवण आयोजित केले होते. या लंचमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुभवांची चर्चा करण्याची संधी मिळाली.

**दुपारी ३:०० : अकॅडमीमधून प्रस्थान**

दिवसाच्या शेवटी, विद्यार्थी ठाण्याच्या दिशेने परत येणाऱ्या बसमध्ये बसले. या प्रवासात त्यांनी अनुभवांची आणि त्यांच्या भविष्यातील आकांक्षांची चर्चा केली.

**निष्कर्ष :-**

महाराष्ट्र ज्युडीशियल अकॅडमीच्या भेटीने व्हिपीएमच्या टीएमसी विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक अनुभव दिला. न्यायालयीन प्रणालीतील करिअर संधींचा अभ्यास केल्याने विद्यार्थ्यांच्या कायद्यातील व्यावसायिक जीवनाबद्दल जागरूकता वाढली.

**आभार :-**

या भेटीच्या आयोजनामध्ये सहकार्य करणारे प्रमुख डॉ. श्रीविद्या जयकुमार यांचे मनःपूर्वक आभार. तसेच, अध्ययन सहलींच्या समितीला त्यांच्या कार्यासाठी विशेष आभार. ज्युडीशियल अकॅडमीच्या प्राध्यापकांचे, त्यांनी केलेले स्वागत, संवादात्मक सत्रे आणि शिक्षणात्मक मार्गदर्शनाबद्दल मनःपूर्वक आभार.



- **आर्ट, थिएटर आणि लिगल रिटरसी कोर्सचा संमारभ**

दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रथम सत्राच्या विद्यार्थ्यांसाठी आर्ट, थिएटर आणि लिगल रिटरसी हा कोर्स सुरू करण्यात आला आहे. मुंबई विद्यापीठाच्या नियमानुसार प्रत्येक सत्रात एक अतिरिक्त विषय शिकविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे हा नवीन विषय/कोर्स सुरू करण्यात आला आहे. यावेळी उद्घाटन करताना ठाणे जिल्हा न्यायालयाचे न्यायाधीश श्री. डोईफोडे साहेबांनी या कोर्सचे कौतुक करताना अशा कोर्समुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढेल अशी खात्री दर्शवली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्रीविद्या जयाकुमार उपस्थित होत्या. या कोर्सेस्साठी प्रा. विनोद एच वाघ, श्री ओमकार अय्यर आणि श्री ओमकार पोपळे शिक्षक म्हणून नेमण्यात आले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती कृष्णा कामथ तर आभार प्रदर्शन प्रा. विनोद एच वाघ यांनी केले.



- **प्रथम वर्षाच्या कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मूट कोर्ट व्याख्यान**

दि.२४/१०/२०२४ रोजी सायंकाळी ७:०० वाजता, सहाय्यक प्रा. यतीन पंडित व सहाय्यक प्रा. चांदनी यांनी प्रथम वर्षाच्या कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी न्यायालयीन क्रिया कलापांविषयी (moot court activities) मूलभूत माहिती देण्यासाठी विशेष मूट कोर्ट व्याख्यान आयोजित केले, जे कायदेशीर शिक्षणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. या संवादात्मक सत्रात मूट कोर्टमध्ये प्रभावीपणे समजून घेण्यासाठी आणि सहभागी होण्यासाठी आवश्यक असलेले खालील विषय समाविष्ट आहेत.

**१. मूट कोर्ट म्हणजे काय?**

व्याख्यानाने विद्यार्थ्यांना मूट कोर्टच्या संकल्पनेची ओळख करून दिली, एक नक्कल न्यायालयीन प्रक्रिया जिथे विद्यार्थी काल्पनिक कायदेशीर खटल्यांचा युक्तिवाद करतात. वास्तविक चाचण्यांच्या विपरीत, मूट कोर्ट्स वस्तुस्थितीवरील विवादांऐवजी कायदेशीर युक्तिवादांवर लक्ष केंद्रित करतात. कायदेशीर संशोधन आणि वकिली कौशल्ये विकसित करण्यात त्यांच्या भूमिकेवर जोर देऊन, विद्यार्थ्यांना मूट कोर्टांची रचना आणि उद्दिष्टे यांची ओळख करून देण्यात आली.

**२. कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी मूट कोर्ट महत्त्वाचे का आहे?**

सैद्धांतिक ज्ञान आणि वास्तविक-जागतिक अनुप्रयोग जोडण्यासाठी एक व्यावहारिक साधन म्हणून मूट कोर्टचे महत्त्व अधोरेखित केले गेले. मूट कोर्टात सहभाग घेऊन, कायद्याचे विद्यार्थी त्यांचे कायदेशीर संशोधन, लेखन आणि तोंडी वकिली कौशल्ये सुधारू शकतात. हे त्यांचा आत्मविश्वास आणि दबावाखाली गंभीरपणे विचार करण्याची क्षमता देखील वाढवते, त्यांना कायदेशीर व्यावसायिक म्हणून भविष्यातील करिअरसाठी तयार करते.

**३. स्मारक कसे तयार करावे (लिखित सबमिशन)?**

व्याख्यानाचा मुख्य फोकस स्मारक तयार करण्याच्या प्रक्रियेवर किंवा लेखी सबमिशनवर होता. विद्यार्थ्यांना त्यांचे स्मारक कसे बनवावे या विषयी मार्गदर्शन करण्यात आले, ज्यामध्ये तथ्यांचे विधान कसे लिहावे, समस्या मांडणे, युक्तिवाद सादर करणे आणि कायदेशीर अधिकाऱ्यांचा हवाला देणे आणि शेवटी प्रार्थना भाग. स्पष्टता, सुस्पष्टता आणि स्वरूपाचे पालन, तसेच संपूर्ण कायदेशीर संशोधनाचे महत्त्व यावर भर देण्यात आला.

**४. तोंडी युक्तिवाद कसे करावेत?**

शेवटी, व्याख्यानाने तोंडी युक्तिवाद प्रभावीपणे वितरीत करण्याच्या तंत्रांना संबोधित केले. विद्यार्थ्यांनी तर्कशुद्धपणे युक्तिवाद आयोजित करणे, न्यायाधीशांच्या प्रश्नांना उत्तरे देणे आणि शांतता आणि व्यावसायिकता राखणे यासाठीची धोरणे शिकवली. प्रेरक संवाद वाढवण्यासाठी व्हॉइस मॉड्युलेशन, डोळा संपर्क आणि देहबोली यावरील व्यावहारिक टिपा सामायिक केल्या गेल्या.

- **प्रथम वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांचे वरिष्ठ वर्षातील विद्यार्थ्यांकडून स्वागत**

प्रत्येक विद्यार्थी त्यांच्या प्रवेशाच्या वेळेपासून त्यांच्या महाविद्यालयातील सर्वांत उल्लेखनीय कार्यक्रम फ्रेशर पार्टीची आतुरतेने वाट पाहत असतो. २३ ऑक्टोबर २०२४ हा दिवस व्हीपीएमचे टी.एम.सी. लॉ कॉलेज, ठाणे मधील २०२४-२०२५ बॅचच्या शैक्षणिक वर्षातील प्रत्येक नवीन विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक संस्मरणीय दिवस होता. फ्रेशर्सचा दिवस उत्साह, आनंद, संगीत, उत्साह, हशा आणि आनंदाने भरलेला होता.

हा तो दिवस आहे जिथे सिनियर्स आणि ज्युनियर्स शेवटी एकत्र येतात आणि कॉलेजचा एक भाग म्हणून साजरा करण्यासाठी एकत्र येतात. एलएलबी III तर्फे आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याचे मोठ्या उत्साहात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्राचार्य आणि सर्व प्राध्यापकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी प्राचार्य डॉ. (सौ.) श्रीविद्या जयकुमार यांनी आपल्या प्रेरक भाषणातून विद्यार्थ्यांचे स्वागत करून उपस्थितांना संबोधित केले. संचालक ज्ञानेश्वरी शिंदे, लक्ष्मीकांत लवाटे यांनी आपल्या प्रेरणादायी विचारांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. मिस्टर अँड मिसेस, एंटरटेनमेंट या श्रेणींमध्ये प्रोग्रामची रचना करण्यात आली होती. या कार्यक्रमामुळे केवळ विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास

वाढवत नाही, तर त्यांचे 'संभाषण कौशल्य' विकसित करते आणि त्यांना मजबूत बनवते, तसेच त्यांचे शैक्षणिक कार्यप्रदर्शन देखील सुधारते. फ्रेशर्स पार्टी म्हणजे एकमेकांशी शाश्वत नातेसंबंध निर्माण करणे. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांमधील एकोप्याचे द्योतक आहे.

धडधडणारे वातावरण, पार्टीचा मूड, तसेच परफॉर्मन्सने स्टेजवर प्रवेश केल्याने उत्साह आणखीनच आनंदी झाला. कॉलेजमधील प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये आनंद दिसत होता. विद्यार्थी समितीच्या प्रत्येक सदस्याच्या आणि सहभागींच्या मदतीशिवाय असा आश्चर्यकारक कार्यक्रम यशस्वी होऊ शकत नाही.

कार्यक्रमाचा समारोप डान्सने झाला; जेथे सर्व विद्यार्थिंनी सर्व ताणतणाव दूर करून आणि निखळ आनंदाच्या क्षणाचा आनंद घेत बीट्सवर नृत्य केलं.



- **एलएलबी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मूट कोर्ट प्रात्यक्षिक**

शुक्रवार, २५ ऑक्टोबर २०२४ रोजी संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत एलएलबीच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मूट कोर्ट प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे २०० विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दोन मूट कोर्ट सत्रे आयोजित करण्यात आली होती, प्रत्येक सत्रात तृतीय वर्षाच्या वर्गातील दोन विद्यार्थी सहभागी होते, ज्यांनी त्यांची वकिली आणि युक्तिवाद कौशल्ये दाखवली. सहाय्यक प्राध्यापक यतीन पंडित आणि डॉ. रुपाली जामोदे यांनी सत्राचे अध्यक्षपद भूषवताना मौल्यवान माहिती व मार्गदर्शन केले. सहाय्यक प्राध्यापक विनोद वाघ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले आणि कार्यक्रम सुरळीत पार पडला. या प्रात्यक्षिकेने विद्यार्थ्यांना मूट कोर्ट कार्यवाहीचा प्रत्यक्ष अनुभव आणि व्यावहारिक कायदेशीर कौशल्यांचे सखोल ज्ञान वाढवण्यास मदत केली.



- **वकिलांसाठी अकाउंटन्सी वर कार्यशाळा दिनांक २६ ऑक्टोबर २०२४.**

वकिलांसाठी त्यांच्या स्वत: च्या कायदेशीर संस्था चालवतात किंवा भागीदारी संरचनांमध्ये गुंतलेले असतात, लेखा ज्ञान प्रभावी आर्थिक नियोजनात मदत करते. आर्थिक स्टेटमेन्ट समजून घेणे, रोख प्रवाह विश्लेषण आणि बजेटिंग वकिलांना त्यांच्या व्यवसाय ऑपरेशन्स, गुंतवणुकीच्या संधी आणि संसाधन वाटप याबद्दल माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत करते. वकिलांसाठी बुककीपिंग त्यांना क्लायंटच्या व्यवसायातील विविध व्यवहार समजून घेण्यास मदत करते. योग्य आर्थिक नियोजन हे सुनिश्चित करते की कायदे कंपन्या आर्थिकदृष्ट्या स्थिर आणि टिकाऊ राहतील, ज्यामुळे त्यांना त्यांच्या ग्राहकांना दीर्घकाळात चांगली सेवा देता येईल.

त्याच प्रकाशात आणि प्रॅक्टिकल ट्रेनिंगचा एक

घटक म्हणून, कॉलेजने शनिवार, २६ ऑक्टोबर २०२४ रोजी संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत ‘वकिलांसाठी अकाउंटन्सी’ या विषयावर विशेष ऑफलाइन व्याख्यान आयोजित केले होते. सहाय्यक प्रा. श्री नीतिन पागी, एमकॉम सीएस (सीए), जे सध्या व्हीपीएमच्या जोशी बेडेकर महाविद्यालय, ठाणे येथे कार्यरत आहेत, यांनी विशेष व्याख्यान दिले. या व्याख्यानाचा मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

### वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा




भारताचे माजी राष्ट्रपती आणि मिसाईल पुरुष डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती १५ ऑक्टोबर हा दिवस ‘वाचन प्रेरणा दिन’ म्हणून पाळण्यात येतो. त्याच पार्श्वभूमीवर विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतन/अभियांत्रिकी महाविद्यालय ठाणे या ग्रंथालय आणि माहिती केंद्रातर्फे १५ ऑक्टोबर या दिवशी ग्रंथालयातील वाचन कक्ष येथे ‘वाचन प्रेरणा दिन’ दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत उत्साहात पार पडला. सदर कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी हजर होते.





वाचनाची आवड निर्माण व्हावी. वाचनाने विद्यार्थी सुसंस्कृत घडू शकतो. या प्रमुख उद्देशाने सदर वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. प्रथम उपस्थित प्रत्येक विद्यार्थ्याने आपापल्या आवडीच्या पुस्तकाचे वाचन केले. सदर कार्यक्रमाला अनेक शिक्षक, आणि शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. श्री चंद्रकांत शिंगाडे, ग्रंथालय सहाय्यक यांनी १५ ऑक्टोबर या दिनाचे महत्त्व विषद केले. त्यांनी आपल्या आवडीचे सुधा मूर्ती लिखित ‘वाइज अँड आदरवाइज’ या पुस्तकातील सचोटी हृदयातून येते ही कथा विद्यार्थ्यांसमोर वाचून दाखविली. डॉ. सौ. गीताली इंगवले, डॉ. सौ. उषा राघवन आणि सौ. विभावरी इखे इत्यादी शिक्षकांनी आप-आपल्या आवडीच्या ग्रंथाचे वाचन केले.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

४ ऑक्टोबर २०२४ : गुरुनानक इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (GNIMS) माटुंगा येथे डॉ. नीतिन जोशी यांचे NBA निकषांसंदर्भात एक मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले.

५ ऑक्टोबर २०२४ : डॉ. श्रीपाद बापट यांच्या मार्गदर्शना अंतर्गत, एम एम एस २०२३-२४ च्या तुकडीची दुसऱ्या वर्षाची विद्यार्थिनी कु. सरिता गुप्ते हिने, ठाकूर कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील समर इंटर्नशिप प्रोजेक्ट प्रेझेंटेशन कॉन्टेस्ट या स्पर्धेमध्ये ६०हून अधिक स्पर्धकांशी स्पर्धा


करून प्रथम क्रमांक पटकावला व रु. १००००/- रकमेचे बक्षीस पटकावले. तर डॉ. पल्लवी चंदवासकर यांच्या मार्गदर्शना अंतर्गत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक, विद्यार्थिनी कु. प्रियांका नागरे हिने पटकावले.

या स्पर्धे मध्ये ब्रिम्सचे एकूण ८ विद्यार्थी सहभागी झाले व एकूण ५ विद्यार्थ्यांची अंतिम फेरीत निवड करण्यात आली.




९ ऑक्टोबर २०२४ : डॉ. नीतिन जोशी यांना विश्वेश्वरय्या इन्स्टिटय़ूट ऑफ मॅनेजमेंट वडाळा येथे विषय तज्ज्ञ व आरएसी सदस्य म्हणून आमंत्रित करण्यात आले.

१३ ऑक्टोबर २०२४ : एम एम एस २०२४-२६ तुकडीच्या प्रथम वर्षाचा विद्यार्थी संघ शार्प शूटर्स - सदस्य जय शिंदे, अनुष्का गायकवाड, तनुक्षा शिंदे आणि अवनीश प्रजापती यांनी विवेकानंद एज्युकेशनल सोसायटीच्या इन्स्टिटय़ूट ऑफ मॅनेजमेंट (VESIM) तर्फे आयोजित 'इंस्प्रोबिझ ५.०' '(Inspirobiz 5.0)' या राष्ट्रीय स्तरावरील 'केस स्टडी डेव्हलपमेंट ॲन्ड ॲनालिसिस' स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक जिंकले. संघाचे मार्गदर्शन प्रा.सिद्धेश सोमण आणि डॉ.पल्लवी चंदवासकर यांनी केले. ब्रिम्सच्या संघाने अव्वल स्थान जिंकण्यासाठी आयआयएमसह देशभरातील २०० हून अधिक सहभागी संस्थांतील विद्यार्थ्यांशी स्पर्धा केली.





१५ ऑक्टोबर २०२४ : ब्रिम्स ग्रंथालया तर्फे वाचन प्रेरणा दिनानिमित्ताने, विविध साहित्य प्रकारांचा परिचय करून देणे आणि पुस्तकांमध्ये दडलेल्या ज्ञानसंपत्तीचा शोध घेण्यासाठी सर्वांना प्रोत्साहित करणे व वाचनाची आवड वाढवणे, या उद्दिष्टाने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

प्रदर्शनाचे उद्घाटन, जोशी बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय, ठाणे च्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ.व्ही.एन. ब्रिम्सचे संचालक, डॉ. नीतिन जोशी, महासंचालक, डॉ. गुरुप्रसाद मूर्ती, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. सुचित्रा नाईक, यांनी डॉ. कलाम यांची वाचनाची आवड आणि त्यामुळे जीवन बदलण्याच्या सामर्थ्यावर त्यांचा विश्वास याबद्दल भाष्य करून; विद्यार्थी आणि शिक्षकांना वाचनाची आजीवन सवय लावण्यासाठी प्रोत्साहित केले.

प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी ग्रंथालयासाठी पुस्तकांची शिफारस करून, स्वतःदेखील पुस्तकांची खरेदी केली.





१६ ऑक्टोबर २०२४ : ब्रिम्सच्या एम एम एस प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा संघ, इको वॉरियर्स, सदस्य - मनस्वी संतोष मोढे, अवनीश महेंद्र प्रजापती, सुजित रघुनाथ कोटियन, ऋषिका अजित शेट्टी, अंकिता दिनकर भुसाणे, अंजली सतीश त्रिवेदी, सयुक्तम विष्णू यज्ञदेव, मनस्वी विलास साळुंखे आणि समीर शिरीष जाधव यांनी लाला लजपतराय इन्स्टिटय़ूट ऑफ मॅनेजमेंट तर्फे आयोजित, 'चक्रव्यूह' या महाविद्यालयीन महोत्सवातील 'स्ट्रीट प्ले' स्पर्धेत उपविजेतेपद पटकावले. या नाटकाची पटकथा आणि दिग्दर्शन सहा. प्राध्यापिका अदिती दामले-पवार यांनी केले.



१६ ऑक्टोबर २०२४ : विद्यार्थ्यांमध्ये 'शाश्वत वित्त' विषयी जागरूकता वाढवण्यासाठी जागतिक गुंतवणूकदार सप्ताह २०२४ या उत्सवाचा भाग म्हणून शाश्वत आर्थिक व्यवहारांची समज वाढवताना सर्जनशील अभिव्यक्तीला प्रोत्साहन देणे या उद्देशाने 'भित्ती-पत्रक स्पर्धे'चे आयोजन करण्यात आले.





१७ ऑक्टोबर २०२४ : सहायक प्राध्यापिका अदिती दामले - पवार यांनी आयोजित केलेल्या तिमाही 'ब्रिम्स चॅम्पियन - पुरस्कार व मान्यता' कार्यक्रमात, सहा. प्रा. प्रथमेश तावडे (प्राध्यापकीय प्रवर्ग) आणि श्री. संदीप गावडे (शिक्षकेतर प्रवर्ग) यांनी गोइंग अबाऊ अँड बियॉन्ड (Going above and beyond), या शीर्षकांतर्गत ब्रिम्स चॅम्पियन क्वार्टर २ साठी विशेष कामगिरी पुरस्कार जिंकले.



१७ ऑक्टोबर २०२४: आय क्यू ए सी (IQAC) समितीने ब्रिम्स कनेक्ट कार्यक्रमात जागतिक गुंतवणूकदार जागरूकता सप्ताहाचा भाग म्हणून आय पी एल (IPL) गुंतवणूक लिलाव खेळ आयोजित केला.



१७ ऑक्टोबर २०२४ : सहाय्यक. प्रा. प्रथमेश तावडे यांनी वाणिज्य शाखेतील यूजीसी नेट परीक्षा उत्तीर्ण केली.

१९ ऑक्टोबर २०२४ : औद्योगिक भेट समितीने जागतिक गुंतवणूकदार सप्ताहाचा एक भाग म्हणून नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट्स (NISM) येथे शैक्षणिक भेटीचे आयोजन केले.



१९ ऑक्टोबर २०२४ : सहाय्यक. प्रा. प्रथमेश यू तावडे यांना लिंक्डइन च्या संपादकांतर्फे, लिंक्डइनच्या मुंबईतील टॉप स्टार्टअप्सच्या नवीन यादी संदर्भात मते / लेख लिहिण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.